**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८१०/नाग/२०११, ८३६/२०११</u>**

१. श्री राजा खान मेहबुब खान - **अपीलकर्ता**
द्वारा डायमंड गॅस हाऊस, शॉप नं.५ छोटी मस्जीद कॉम्प्लेक्स,
सदर बाजार, नागपूर -४४०००१.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक - **उत्तरवादी**
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्या. नागपूर
पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड, रामदासपेठ नागपूर-१२.

३. जनमाहिती अधिकारी तथा विभागीय उपव्यवस्थापक - **उत्तरवादी**
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्या. नागपूर
पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड, रामदासपेठ नागपूर-१२.

**(आदेश पारित दिनांक १६/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. २३/०५/२०११ आणि दि.२६/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडेमाहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.११/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१६/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.प्रस्तुत दोनही अपीलांमध्ये जनमाहिती अधिकारी आणि अपीलकर्ता हे एकच असल्यामुळे आणि माहितीचा विषय देखील एकच असल्यामुळे दोनही अपीलांची सुनावणी एकत्रीत घेण्यात येऊन दोनही अपीलांचा खालीलप्रमाणे एकत्रीत निर्णय देण्यात आला.

२. आज आयोगापुढे सुनावणीकरीता अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा विभागीय उपव्यवस्थापक श्री अलोणी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२२/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सदर माहितीच्या अर्जात महामंडळाच्या वतीने कोळसा ब्रिकेट धारकांना एप्रिल २०१० ते जानेवारी २०११ मध्ये वे.को.लि. आणि एस.ई.सी.एल. कोळसा कंपनीतून किती मे टन कोळसा वितरीत करण्यात आला त्याबाबत एकूण १ ते ४ मुद्यावर माहिती मागितलेली आहे. तसेच दि.२२/०२/२०११ च्या दुसऱ्या माहिती अर्जान्वये महामंडळाच्या वतीने विट भट्टी धारकांना करण्यात येत असलेल्या कोळसा वितरण बाबत आक्टोबर २०१० ते जानेवारी २०११ या वर्षातील ५ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. अपीलार्थीच्या दि.२२/०२/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलार्थीने ४ मुद्यांवर मागितलेल्या माहितीच्या संदर्भात एकूण कागदपत्रांची संख्या अंदाजे २००० पेजेस इतकी होणार होती म्हणून अपीलार्थीस प्रती पेज रु.२/- प्रमाणे माहितीचे शुल्क रु.४०००/- आणि ५ मुद्यांवर मागितलेल्या माहितीच्या संदर्भात प्रती पेज रु.२/- प्रमाणे एकूण रु.६०००/- इतके शुल्क भरण्यास कळविण्यात आले. सदरचे माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र पंजीबध्द डाकेने पाठविण्यात आले आणि सदर पत्र दि.२६/०२/२०११ रोजी अपीलार्थीस प्राप्त झाले त्याची पोच जनमाहिती अधिकारी श्री अलोणी यांनी आयोगापुढे दाखविली. परंतू अपीलार्थीने माहितीच्या शुल्काचा भरणा केला नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विभागीय व्यवस्थापक यांचेकडे दाखल केले.

३. विभागीय व्यवस्थापक यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि.२८/०३/२०११ रोजी निर्गमित केला. त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलार्थी यांना माहिती अधिकाऱ्याने कळविलेल्या माहितीच्या शुल्काबाबत शंका असल्याने प्रथम माहितीचे निरिक्षण करण्यास अपीलार्थीस वेळ देण्यात यावा आणि कागदपत्रांचे निरिक्षण झाल्यानंतर अपीलार्थीस माहितीच्या शुल्काबाबत कागदपत्रांची संख्या किती होत आहे त्याची खात्री करुन द्यावी. आणि सदर रकमेचा भरणा करुन अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलाचे आदेश देण्यात आले असल्याचे श्री आलोणी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. प्रथम अपीलाच्या या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी श्री अलोणी यांनी अपीलार्थीस दि.०७/०४/२०११ रोजी पत्र पाठवून माहितीचे निरिक्षण करण्यासाठी त्यांचे कार्यालयात दि.१३/०४/२०११ रोजी उपस्थित राहण्याबाबत कळविले होते. आणि त्या पत्रामध्ये निरिक्षणाचा कालावधी देखील नमुद केला होता. सदर पत्र

अपीलार्थीस प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीने पुन्हा जनमाहिती अधिकारी यांना निरिक्षणाचा कालावधी कमी आहे म्हणून निरिक्षणाचा कालावधी वाढविण्याबाबत विनंती केली. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.१५/०४/२०११ रोजी पत्र देऊन निरिक्षणाचा कालावधी वाढवून दिला. आणि त्या पत्रामध्ये असे नमुद केले की, आपणास कागदपत्रांचे प्रत्यक्ष निरिक्षण अवधी कमी पडला तर कागदपत्रांच्या निरिक्षणाकरीता अतिरिक्त अवधी देण्यात येईल. परंतू अपीलकर्ता हे कागदपत्रांचे निरिक्षण करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाही. म्हणून त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी श्री अलोणी यांनी सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या दि.२२/०२/२०११ च्या दोनही माहिती अर्जांना अनुसरुन माहितीचे शुल्क भरण्याबाबत दि.२३/०२/२०११ च्या पत्रान्वये कळविले आहे. मात्र याबाबत अपीलार्थीचे प्रामुख्याने असे म्हणणे आहे की, माहिती अधिकाऱ्याने शुल्क भरण्याबाबतचे पत्र दिले आहे त्यामध्ये सविस्तर हिशोब दिलेला नाही म्हणून अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरणा केले नाही. त्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्रांचे निरिक्षण करुन घेऊन त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे शुल्क भरुन जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. मात्र अपीलार्थीस कागदपत्रांच्या निरिक्षणासाठी पुरेसा अवधी जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे वरील दोनही अपील ही अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून सात दिवसांचे आत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कागदपत्रांचे निरिक्षण करुन घेण्यासाठी लेखी पत्र द्यावे. आणि अपीलकर्त्याने निरिक्षणानंतर मागणी केलेल्या कागदपत्रांच्या शुल्काचा भरणा करुन अपीलार्थीस त्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कागदपत्रांचे निरिक्षणासाठी तारीख व वेळ लेखी कळविण्यात आल्यानंतर त्या तारखेस अपीलार्थीने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्रांचे निरिक्षण करुन घेऊन पाहिजे असलेल्या माहितीचे शुल्क भरुन आवश्यक ते कागदपत्रे उपलब्ध करुन घ्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र.८७५/नाग/२०११</u>

१. श्री पुरुषोत्तम मोतीरामजी कोल्हे - **अपीलकर्ता**
काजी वार्ड मु. पो. हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक - **उत्तरवादी**
उच्च शिक्षण विभाग नागपूर
ता. जि. नागपूर.

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
सहसंचालक उच्च शिक्षण विभाग नागपूर
ता. जि. नागपूर.

**(आदेश पारित दिनांक ०२/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०२/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे आज आयोगापुढे सुनावणीकरीता हजर होते. तसेच त्यांनी लेखी निवेदन दिले आहे की, त्यांनी दि.२०/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, सहसंचालक उच्च शिक्षण विभाग नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री अे. के. कांबळे यांची पदोन्नतीने प्रयोगशाळा सहाय्यक पदावर करण्यात आलेल्या अवैध पदोन्नती बाबत श्री मनोहर लुटे यांनी दि. २५/०९/२०१० ला तक्रार अर्ज दिला होता. त्या तक्रार

अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.१२/०१/२०११ रोजी माहिती प्राप्त झाली मात्र सदर माहिती ही त्रुटीपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील खारीज करण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक सह संचालक उच्च शिक्षण विभाग नागपूर श्री रविन्द्र चोपडे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक डॉ. अजीत देशमुख हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री रविन्द्र चोपडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२०/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२८/१२/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्राचार्य आर. एस. बीडकर महाविद्यालय जि. हिंगणघाट यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून श्री मनोहर घुटे यांच्या दि.२५/०९/२०१० च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागविला. प्राचार्य यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दि.१२/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती पाठविली आणि त्या माहितीमध्ये असे नमुद केले की, श्री अे. के. कांबळे प्रयोग शाळा सहाय्यक यांची दि.२२/०१/२००८ ल शिपायी पदावरुन प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर रितसर नियमानुसार व बिंदु नामावली नुसार आपली मान्यता लक्षात घेऊन पदोन्नती दिली आहे. तसेच बिंदु नामावलीनुसार अनुसुचित जाती या प्रवर्गातील प्रयोग शाळा सहाय्यक हे पद पदोन्नतीने भरावयाचे असल्याने व या महाविद्यालयात शैक्षणिक पात्रता धारक व अनुसुचित जातीमधील श्री अे. के. कांबळे हे सेवा जेष्ठ कर्मचारी असल्याने नियमानुसार पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामुळे श्री कांबळे यांचे संबंधित केलेल्या तक्रार चुकीची व आधारहिन आहे अशी माहिती प्राचार्यांनी दि.१२/०१/२०११ च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. आणि सदरच्या माहितीची प्रत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दि.१७/०१/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली आहे.

४. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सह संचालक यांचेकडे दाखल केले. सहसंचालकांनी देखील जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्त्यास दि. १७/०१/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील खारीज केल्याचे श्री देशमुख यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता यांचे लेखी निवेदन तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि.२०/१२/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि.१७/०१/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.८७६/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोज जनार्दन पाटील<br>सचिव, संघर्षशिल बहुजन पत्रकार महासंघ, नागपूर<br>सर्कल नं. १७/२३, लष्करीबाग, नागपूर.<br>ता. जि. नागपूर -४४० ०१७. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>दक्षता व गुण नियंत्रण मंडळ (सा. बां.) नागपूर<br>३९/१, बांधकाम संकुल, सिव्हील लाईन्स, नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (श्रेणी-२)<br>दक्षता व गुण नियंत्रण मंडळ (सा. बां.) नागपूर<br>३९/१, बांधकाम संकुल, सिव्हील लाईन्स, नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे आज आयोगापुढे सुनावणीकरीता हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०८/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा अभियंता श्रेणी-२ दक्षता व गुण नियंत्रण मंडळ सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग नागपूर चे मुख्य अभियंता, श्री दि. ना. पोटदुखे यांच्या कार्यालया मार्फत विविध कामाच्या चौकशी करिता आपले विभागाकडून पाठविण्यात आलेल्या चार्जशिटच्या प्रतिलीपी किंवा तक्रारी च्या प्रती त्यांनी मागितल्या

होत्या. तसेच सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग नागपूर द्वारे आपणाकडे पाठविण्यात आलेल्या दि.२२/०३/२०१० च्या अनुषंगाने चौकशी केलेल्या अहवालाची प्रत त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना दि. ०६/०४/२०११ च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी असे कळविले की, सदरची माहिती विभागीय चौकशी प्रकरणाशी संबंधित असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१) (h) अन्वये प्रशासकीय कार्यवाही बाधीत होवू नये म्हणून आपणास ही माहिती पुरविणे शक्य नाही. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. मात्र कार्यकारी अभियंता यांनी देखील सदर प्रकरणाची चौकशी प्रक्रीया सुरु असल्याने माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद करुन प्रथम अपील खारीज केले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी श्री प्रफुल्ल झाडे हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री तेलंग हे उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री प्रफुल्ल झाडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०८/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. ०९/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेल्या माहिती विभागीय चौकशी प्रकरणाशी संबंधित असल्याने आणि चौकशी तेव्हा प्रगतीत असल्याने चौकशी संबंधी माहिती देणे आवश्यक नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१) (h) अन्वये माहिती दिलेली नाही असे अपीलार्थीस दि.०६/०४/२०११ च्या पत्रान्वये कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना कोणत्याही चार्जशिटची माहिती मिळाली नाही. प्रस्तुत प्रकरणात ज्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत फक्त त्याच तक्रारीच्या प्रती त्यांना हव्या आहेत.

४. अपीलकर्ता आणि जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून केल्यानंतर अपीलकर्त्यास सदरच्या तक्रारीच्या प्रती उपलब्ध करुन दिल्यास चौकशीवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही म्हणून जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रस्तुत प्रकरणात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या प्रती उपलब्ध करुन देण्याचे आयोगापुढे मान्य केले म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रस्तुत प्रकरणी तक्रारीच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.८७४/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री ॲड. राजेश कांताप्रसाद तिवारी<br>माऊली रोड नं.६, विश्वकर्मा नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (आर्थिक)<br>गुन्हे शाखा, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त<br>गुन्हे शाखा, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २६/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचे वतीने ॲड करण गौर हे आज आयोगापुढे सुनावणीकरीता हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२१/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा पोलीस आयुक्त गुन्हे शाखा नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री रविश कुमार चंद्रकुमार चावरीया रा. तीन नल चौक कसारपूरा नागपूर यांचेविरुध्द विविध पोलस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या संपूर्ण गुन्हयांची माहिती व प्रथम खबरी अहवालाची प्रत त्यांनी मागितली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२८/०४/२०११ च्या पत्रान्वये सदरची माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (छ) नुसार देता येत नाही असे कळविले

म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपायुक्त (आर्थिक) गुन्हेशाखा नागपूर नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. तसेच ॲड करण गौर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीस श्री चावरीया यांचेविरुध्द दाखल करण्यात आलेले FIR च्या प्रती त्यांना पाहिजे आहेत. आणि FIR च्या प्रती माहिती अधिकारान्वये उपलब्ध करुन देण्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ हे लागू होत नाही कारण FIR चे कलम हे कोणत्याही स्वरुपात गोपनीय कागदपत्रे राहत नाही. त्यामुळे सदरच्या FIR च्या प्रती त्यांना मिळणे आवश्यक आहे.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त गुन्हेशाखा नागपूर यांचे वतीने श्री अशोक बोंदरे हेड कॉन्स्टेबल हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त यांच्या वतीने श्री रविन्द्र उके हेड कॉन्स्टेबल हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांचे वतीने हजर असलेले श्री अशोक बोंदरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २१/०४/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांनी पोलीस आयुक्त कार्यालयाकडे पाठविला होता. पोलीस आयुक्त नागपूर कार्यालयाकडून दि.२५/०४/२०११ रोजी सदरचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात विधी अधिकारी यांना दि.२७/०४/२०११ रोजी पत्र पाठवून त्यांचे मत मागविण्यात आले. त्यानंतर प्रस्तुत प्रकरणी साकल्याने विचार करुन अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याने व ती माहिती उघड केल्याने संबंधित व्यक्तीची शारीरीक सुरक्षितता धोक्यात येईल. म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (छ) नुसार माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्त्यास दि. २८/०४/२०११ च्या पत्राने कळविण्यात आले. त्यानंतर अपीलकर्त्याने दि.१०/०५/२०११ रोजी प्रथम अपील पोलीस उपायुक्त यांचेकडे दाखल केले. अणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. २१/०५/२०११ रोजी देण्यात आला. त्या निर्णयामध्ये अपीलार्थीने मागितलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्ती संबंधित आहे तसेच त्रयस्थ व्यक्तीने त्याची माहिती देण्यास नकार कळविलेला आहे तसेच ही माहिती दिल्यास न्यायालयीन चौकशी व तपासात अडचण आणण्याची शक्यता आहे असे कारण नमुद केले म्हणून सदरचे प्रथम अपील फेटाळण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री उके यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता यांचे वकील तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले त्यांचे प्रतिनिधी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याने श्री रविश कुमार चंद्रकुमार चवरीया यांचे विरुध्द दाखल झालेल्या गुन्हया संदर्भात FIRची प्रत

मागितलेली असून सदर FIR ची प्रत उपलब्ध करुन दिल्यास चौकशीत कोणतीही बाधा येवू शकत नाही असे जनमाहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री बोंदरे यांनी देखील आयोगापुढे सांगितले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्यास त्यांच्या दि.२१/०४/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन श्री रिवश कुमार चंद्रकुमार चवरीया यांचेविरुध्द दाखल झालेल्या गुन्हयाबद्यलच्या FIR ची प्रत उपलब्ध करुन दिल्यास शासनाच्या कार्यालयातील पारदर्शकता दिसून येईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे FIR ची प्रत विनामुल्य व्यक्तीशः किंवा डाकसेवेद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र.७७४/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक<br>C/o, प्रधान मुख्य वनसंरक्षक, वनभवन, सिव्हील लाईनस नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कक्ष-७-अ)<br>C/o, प्रधान मुख्य वनसंरक्षक, वनभवन, सिव्हील लाईनस नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०६/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०६/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०५/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-७-अ प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन लिपीक/लेखापाल यांची १९९५ मधील विभागीय परिक्षेच्या संदर्भात १ ते ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२९/०१/२०११ च्या पत्रान्वये मुद्येनिहाय माहिती कळविण्यात आली परंतू त्यांना

पाहिजे असलेली अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.११/०२/२०११ रोजी प्रथम अपील वनसंरक्षक यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आल्यामुळे त्यांनी दि.१३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री एस. एस. डायरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक श्री एम. एम. गवळी हे उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री एस. एम. डायरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०५/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.११/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दि.२९/०१/२०११ च्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे सांगितले. तसेच अपीलार्थीने मागितलेल्या यादीच्या प्रती उपलब्ध नाही अशी माहिती अपीलार्थीस कळविण्यात आली. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील वनसंरक्षक यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. ११/०३/२०११ रोजी देण्यात येवून त्यामध्ये असे नमुद केले की, माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष ७-अ यांचेकडे संचिकेत मुद्या क्र.६ च्या संदर्भात सन १९९५ च्या परिक्षेचे तक्ते उपलब्ध आहेत ते तक्ते प्राप्त करण्यासाठी अपीलकर्त्याने वेगळा अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावे असे अपीलकर्त्यास कळविले म्हणून प्रथम अपील फेटाळल्याचे श्री गवळी यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने सन १९९५ मधील लिपीक व लेखापाल यांच्या विभागीय परिक्षे संदर्भात याद्या मागविल्या आहेत. परंतू सदरच्या यादया उपलब्ध नाहीत असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयात नमुद केल्याप्रमाणे मुद्या क्र. ६ च्या संदर्भात नस्तींचे निरिक्षण केले असता त्यात सन १९९५ च्या परिक्षेचे काही तक्ते दिसून येतात म्हणून सदरचे तक्ते अपीलकर्त्यास शुल्क भरुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केलेल्या तक्त्यांच्या माहितीचे शुल्क लेखी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे कळवावे. आणि अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यानंतर अपीलकत्या्रस सन १९९५ च्या परिक्षेचे तक्ते उपलब्ध करुन द्यावे.

२. अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी आवश्यक ते शुल्क भरणा करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७७७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक (सं.)<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०६/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०६/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१५/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी अनुसूचित जाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली यांचेकडे माहिती अधिकाराखालील अर्जान्वये राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांचेकडील अपील क्र. ९४१/२००९ मधील आदेश दि.०९/११/२००९ नुसार संशोधन अधिकारी यांना शास्ती लावलेली आहे त्या शास्तीच्या वसूलीच्या संदर्भात त्यांनी माहिती मागितली होती. परंतू शास्तीची वसूली लवकर केली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी श्री अशोक वहाणे हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक डॉ. आर. डी. त्रिभुवन हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री वहाणे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि. १५/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१८/०३/२०११ रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि. २५/०३/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस असे कळविले की, श्री अशोक वहाणे यांच्या दरमहाचे वेतनातून शास्तीची वसूली करण्याची कार्यवाही सुरु आहे. कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर रु.२५०/- शासकीय खजिन्यात दाखल करण्यात येईल व त्यानंतर पगारपत्रकाची झेरॉक्स प्रत आपणास देता येईल. तसेच अपीलकर्त्यास श्री वहाणे यांच्या सेवा पुस्तकाचे पहिल्या पानाची प्रत देखील उपलब्ध करुन देण्यात आली असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले.

त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसंचालक यांचेकडे दाखल केले. आणि उप संचालकांनी दि.१२/०५/२०११ च्या पत्राने अपीलकर्त्यास श्री वहाणे यांच्या शास्तीच्या रकमेचे शुल्क रु.२५०/- ची वसूली केली त्याबाबतची पावती व चलनाची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे डॉ. त्रिभुवन यांनी सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगासमोर मान्य केले. मात्र श्री वहाणे यांच्या सेवापुस्तकात या बाबींची नोंद नाही असे त्यांनी सांगितले. परंतू आयोगाकडील आदेशाप्रमाणे रु. २५०/- च्या शास्तीची कार्यवाही केली आहे त्याप्रमाणे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झालेली दिसून येते म्हणून अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र.८९५/नाग/२०११</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विश्वास अरविंद बागडदेव<br>१६७, विश्वास, टिकेकर रोड, धंतोली नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी<br>नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (संपती)<br>नागपूर सुधार प्रन्यास नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०६/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०६/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२७/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन शासन निर्णय महसूल व वनविभाग दि. ०१/०७/२००४ च्या अदयाधेशाप्रमाणे नाहरकत प्रमाणपत्र विक्रीकरिता अर्ज टाकत असतांना आममुख्त्यारपत्र कोणत्या कायदयाच्या कोणत्या कलमांतर्गत घोषणापत्र रु. १००/- रु. स्टॅम्प पेपरवर मागितले जाते त्याची अधिसुचना प्रत देण्यात यावी कारण महसूल व वनविभागाच्या दि. ०१/०७/२००४ च्या अध्यादेशानुसार स्टॅम्प

डयुटी माफ केली आहे अशी त्यांनी माहिती मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२५/०१/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, विषयांकित अर्जातील अनु क्रमांक.२ बाबत सादर केलेल्या घोषणापत्र नोटरी करुन प्रमाणित केली तर नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. तसेच अनु. क्र. १ बाबत आपण कार्यालयात उपस्थित रहावे म्हणजे माहिती देता येईल असे त्यांना कळविले. परंतू त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे दाखल केले. परंतू त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा सहा. अभियंता श्री गौर हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री देशभ्रतार हे उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा सहा. अभियंता श्री गौर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२७/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यानुसार अपीलकर्ता यांना दि.२५/०१/२०११ च्या पत्राने उत्तर पाठविण्यात आले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी असे दिसून आले की, अपीलकर्त्याने माहितीच्या अधिकारांतर्गत दाखल केलेल्या अर्जासोबत शासनाचे दि.०१/०७/२००४ चे अदयाधेश जोडले आहेत. या अध्यादेशात नमुद दस्तऐवजावरील स्टॅम्प डयुटी शासनाने माफ केली असतांना नागपूर सुधार प्रन्यास द्वारे स्टॅम्प पेपरवर वरील दस्तऐवज कोणत्या कायदयाच्या आधारे घेता येतात यावर विचारणा करुन आक्षेप घेतला आहे. म्हणून याबाबत नमुद करण्यात येते की, नागपूर सुधार प्रन्यास कडे आममुख्त्यारपत्र (Power of Attorny) आधारे नाहरकत प्रमाणपत्रासाठी किंवा तत्सम बाबींसाठी अर्ज केल्यास शपथपत्र घोषणापत्र स्टॅम्प पेपरवर अंदाजे सन २००२ पासून मागविण्यात येते. त्या मागचा मुख्य उदेदश भुखंडाचा गैरव्यवहार होऊ नये असा आहे. परंतू अपीलार्थीने दि.०१/०७/२००४ चा शासकीय आदेश लक्षात आणून देण्यात आला असल्याने त्यावर विधीसल्ला घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे अपीलार्थीस सुनावणीचेवेळी श्री देशभ्रतार यांनी सांगितले.

प्रथम अपीलीय अधिकारी श्री देशभ्रतार यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, त्यांनी दि.०८/०६/२०११ रोजी अवर सचिव, महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे शासनाचे दि.०१/०७/२००४ च्या अदेशाची प्रत त्यांच्याकडे पाठवून त्या आदेशानुसार नागपूर सुधार प्रन्यास द्वारे घेण्यात येणारे शपथपत्र घेण्याची आवश्यकता आहे अगर कसे याबाबत मार्गदर्शनासाठी स्मरणपत्र पाठविण्यात येईल असेही श्री देशभ्रतार यांनी सांगितले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी शासनाकडील दि.०१/०७/२००४ च्या अदयाधेशावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी शासनाकडून मार्गदर्शन पुन्हा मागवावे. तसेच सदर पत्राची प्रत आणि यापूर्वी पाठविलेल्या पत्राच्या प्रती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलार्थीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी शासनाच्या दि.०१/०७/२००४ च्या आदेशाबाबत मार्गदर्शन मागवावे व त्याची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी तसेच. यापूर्वी या संदर्भात शासनाकडे झालेल्या पत्रव्यवहाच्या प्रती देखील अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र.८९२/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री कवडू जनार्धन येनप्रेड्डिवार<br>मु. पो. मुल.<br>ता. मुल. जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद कार्यालय मुल<br>ता. मुल जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>नगर परिषद कार्यालय मुल<br>ता. मुल जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०३/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१६/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय मुल यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन नगर परिषद क्षेत्रात २१६ संडास कुठे कोणत्या लोकांच्या घरी बांधण्यात आले आहेत त्याबाबत दिलेल्या अनुदानाची रक्कम ते मोक्यावर दाखवून द्यावे

तसेच संडास योजनेचा लाभ घेतलेल्या लोकांना नगदी रुपात किती रक्कम देण्यात येते व किती रुपये पर्यन्त त्यांच्या नावाने चेक देण्यात येतात तसेच मुल नगर परिषद क्षेत्रात ४८ जुने पूल कोठे बांधले आहेत ते ठिकाण मोक्यावर दाखवून द्यावे. अशी माहिती त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी सौ. शंकुतला समर्थ आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचे तर्फे श्री मोहुर्ले कनिष्ठ अभियंता हे उपस्थित होते.

जनमाहिती अधिकारी सौ समर्थ यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१६/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दि.२४/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही नगर परिषदेच्या बांधकाम विभागाशी संबंधित असल्याने त्यांच्या विभागास दि.२५/०३/२०११ रोजी पत्र पाठवून माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविले त्याला अनुसारुन बांधकाम विभागाने दि.२०/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकरी यांना माहिती पुरविली. त्यानंतर माहितीचे शुल्क भरणे बाबत अपीलकर्त्यास दि.२१/०४/२०११ ला कळविण्यात आले. आणि अपीलकर्त्यास दि.२७/०४/२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र त्यांना संडास व पूल कोणत्या मोक्यावर आहेत याबाबतची माहिती मिळाली नाही त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, आवश्यक ती माहिती दिल्यामुळे मोक्यावर जाण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू प्रत्यक्ष मोक्यावर जावून माहिती तपासून देणे अपेक्षित नाही म्हणून याबाबत नगर पालिकेने त्यांच्या क्षेत्रात २१६ संडास ज्यांना मंजूर केले आहेत. त्याची यादी आणि ४८ पूलांच यादी अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच ज्यांना संडास अनुदान रक्कम दिलेली आहे त्यापैकी ज्यांना नगदी स्वरुपात अनुदान दिले आहे त्यांच्या यादया देखील अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी २१६ संडास बांधकामाची यादी व ४८ पूलांच्या झालेल्या बांधकामाची यादी विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने अपीकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी. तसेच ज्या व्यक्तींना संडास बांधकामचे अनुदान दिले आहे त्यातील नगदी स्वरुपात दिलेले अनुदान व चेक स्वरुपात दिलेल्या अनुदानाची यादी देखील अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र.८९१/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री ज्ञानेश्वर मुखरुजी मस्के<br>जवाहर वार्ड, मु. पो. देसाईगंज (वडसा)<br>ता. देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली-४४१ २०७. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती ब्रम्हपुरी<br>ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्राम पंचायत कार्यालय मेंडकी<br>ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३१/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०३/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे गैरहजर आहेत मात्र उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे आज सुनावणीकरीता आयोगापुढे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत मेंडकी, ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर श्री केवलराम सांगोळकर आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती ब्रम्हपुरी यांचे तर्फे कक्ष अधिकारी श्री विवेक बेल्लारवार हजर आहेत.

३.	जनमाहिती अधिकारी श्री सांगोळकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.१५/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. १९/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सदरच्या माहिती अर्जात विनायक विश्वनाथ पाठमोडे, ग्राम पंचायत सदरस्य यांच्या नावाने मौजा मेंडकी येथे सन २००९ मध्ये किती मकान होते व कोणत्या सिटी सर्व्हे क्रमांकामध्ये आहेत याबाबत १ ते ५ मुद्यांवर माहिती मागितली आहे. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. ०५/०४/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती घेऊन जाणे बाबत कळविले. सदरचे दि.०५/०४/२०११ चे माहितीचे शुल्क भरण्याचे पत्र अपीलकर्त्यास मिळाल्याची पोच घेण्यात आली. परंतू अपीलकर्ता यांनी माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती ब्रम्हपुरी यांचेकडे दाखल केले. त्यानुसार दोनवेळा प्रथम अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली मात्र दोनही वेळेच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर झाले नाही म्हणून प्रथम अपीलावर निर्णय देण्यात आला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री बेल्लावार यांनी सांगितले.

४.	जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.०५/०४/२०११ च्या पत्राने माहितीचे शुल्क भरणा करणे बाबत पत्र दिले आहे. त्या प्रमाणे अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरुन घेऊन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे माहितीच्या शुल्काचा भरणा करावा आणि माहितीच्या शुल्काचा अपीलार्थीने भरणा केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र.८९०/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर विश्वनाथ बडवाईक<br>मु. पो. तारसा<br>ता. मौदा जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>रामटेक<br>ता. रामटेक जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय मौदा<br>ता. मौदा जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०३/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत तसेच उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय मौदा यांचेकडे दिनांक १८/०३/२०११ च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये त्यांच्या दि.२९/१२/२००३ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती तसेच ग्रामपंचायत तारसा यांनी अंगणवाडीचे बांधकाम अतिक्रमणात केलेले आहे. त्याचा तलाठी यांनी दि.२२/०७/२००५ ला अहवाल दिलेला आहे. त्यावर केलेली कार्यवाही आणि दि.१८/०२/२०११ चे महसूल व वनविभागाच्या पत्राची प्रत त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना अपेक्षित माहिती

मिळाली नाही म्हणून त्यांनी उपविभागीय अधिकारी रामटेक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार मौदा श्रीमती व्ही. एन. लांजेवार उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक श्री गिरीश जोशी हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्रीमती व्ही. एन. लांजेवार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दि.१८/०३/२०११ चा माहिती अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि.३१/०३/२०११ च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. त्या माहितीमध्ये नायब तहसिलदार (निमखेडा सर्कल) मौदा यांच्या दि.३१/०३/२०११ च्या पत्राची प्रत तसेच नायब तहसिलदार मौदा यांच्या दि. १८/०२/२०११ च्या पत्राची प्रत आणि महसूल व वनविभाग यांचेकडील दि.२६/०५/२००४ च्या पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.३१/०३/२०११ रोजी पोस्टाने उपलब्ध करुन दिल्याचे जावक क्र.४१९ नुसार पाठविल्याचा पुरावा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविला. त्यावरुन दि.३१/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस सदर माहिती पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते. परंतू सदरचे पत्र अपीलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपीलकर्त्याने सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पुन्हा दि.३१/०३/२०११ च्या पत्राची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन दिली. सदर माहिती अपीलार्थीने स्विकृत केली म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.६८२/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री जितेन्द्र हरीश्चंद्र वाघमारे<br>C/o, मंदा जी. बोपचे, महावीर वर्धमान वार्ड,<br>सहयोग कॉलनी , गणेश नगर, गोंदिया.<br>ता. जि. गोंदिया. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क)<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. मुंबई<br>धारावी रोड, माटुंगा, मुंबई-४०० ०१९. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक (क-अतां/आस्था)<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. मुंबई<br>प्लॉट नं. जी-९ प्रकाशगड , अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,<br>बांद्रा (पूर्व) मुंबई-४०० ०५१. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१९/०७/२०११ रोजी नोटीस काढून दि.०४/०८/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर व उत्तरवादी हजर होते. परंतू अपीलकर्ता व उत्तरवादी यांच्या संमतीने सुनावणीची पुढील तारीख दि.०७/०९/२०११ ठेवण्यात आली. परंतू आज प्रस्तुत सुनावणीकरीता अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र प्रस्तुत सुनावणीकरीता जनमाहिती  अधिकारी तथा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी श्री प्रवीण बागुल हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक श्री संदेश हाके हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री बागुल यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१७/०९/२०१० चा माहितीचा  अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०४/१०/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीने सदर माहिती अर्जात उप कार्यकारी अभियंता, या पदाच्या निवडी संदर्भात  a,b,c,d,e,f,g,h, या मुद्यांच्या बाबत माहिती मागितली होती. अपीलार्थीच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी सदर माहिती ज्या विभागाशी संबंधित होती त्या विभागाकडून सदरची माहिती संकलीत केली. आणि त्या विभागाकडून माहिती संकलीत झाल्यानंतर अपीलार्थीस दि.२६/१०/२०१० रोजी उपलब्ध करुन दिली. परंतू सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून अपीलार्थीने दि.०९/१२/२०१० रोजी महाव्यवथापक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी दि. १३/०१/२०११ रोजी घेतली त्या सुनावणीचेवेळी अपीलकर्ता हे उपस्थित होते आणि जनमाहिती अधिकारी हे देखील उपस्थित होते. दोघांचेही म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१५/०१/२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित केला. त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्यास निवड केलेल्या उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेची माहिती तसेच अनुभवाची माहिती आणि जात वैधता प्रमाणपत्र इ. बाबतची माहिती देणे बाबत निर्देश देण्यात आले. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी संबंधित उमेदवारांकडून ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना पत्र व्यवहार केला आणि उमेदवारांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.०२/०२/२०११ रोजी माहिती सादर केली. सदरची माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दि.०४/०२/२०११ रोजी उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्याचप्रमाणे किरण नायगावकर यांचेबाबतची माहिती देखील उपलब्ध करुन दिली आणि श्री माने सुनिल महादेव यांच्याबाबतची माहिती देखील  दि. १२/०८/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

३.	जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता यांनी यापूर्वी देखील अशाच प्रकारचे अपील क्र. ६३१/२०११ दाखल केले होते. त्यामध्ये देखील अशाच स्वरुपाची माहिती मागितली होती. आणि त्या प्रथम अपीलाच्या  निर्णयास अनुसरुन अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.१७/०९/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन वर नमुद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

<u>**अपील क्र.७८५/नाग/२०११**</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री टी. एच. नायडू<br>२३, सप्तश्रृंगी विहार, शिव मंदिराच्या शेजारी,<br>एच. बी. ईस्टेट, सोनेगांव,<br>नागपूर-४४००२५. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक<br>महानगर पालिका, लक्ष्मीनगर झोन-१, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता<br>महानगर पालिका, लक्ष्मीनगर झोन-१, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०७/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महानगर पलिका लक्ष्मीनगर झोन नागपूर यांचेकडे दि.२०/१२/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये महानगर पालिकेच्या सहायक संचालक नगर रचना विभाग यांचेकडील दि.०१/१२/२००७ च्या पत्राने आणि दि.०६/०५/२००६ च्या पत्रान्वये सप्तश्रृंगी डेव्हलपर्स यांनी केलेल्या अतिक्रमणाबाबत दिलेल्या पत्रावर काय कार्यवाही केली याबाबतची माहिती मागितली होती. त्यांना दि.२०/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी पत्र पाठवून संपूर्ण मागितलेल्या

माहितीची पाने ५१ असून त्याच्या सत्यप्रतीकरिता रु.१०२/- माहितीचे शुल्क भरण्यास कळविले यांनी त्यानुसार अपीलार्थीने माहितीचे शुल्क रु.१०२/- चा भरणा केला. आणि त्यानंतर त्यांना ५१ पेजेसच्या ऐवजी २२ पेजेसची माहिती मिळाली. इतर माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही. मात्र अपीलकर्ता यांचेकडून ५१ पेजेसप्रमाणे माहितीचे शुल्क घेण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता श्री कहाळकर हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त, म.न.पा. श्री जयदेव हे उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री कहाळकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२२/१२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचे एकूण पेजेस ५१ होते म्हणून या ५१ पेजेसच्या माहितीचे शुल्क रु.१०२/- भरणा करणेबाबत अपीलकर्त्यास दि.२०/०१/२०११ च्या पत्रान्वये कळविले आणि सदरच्या पत्रात अपीलार्थीस कनिष्ठ अभियंता म्हणून नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची यादी उपलब्ध करुन दिली. त्यानुसार अपीलार्थीने दि.२४/०१/२०११ रोजी माहितीचे शुल्क रु.१०२/- चा भरणा केला आणि अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली मात्र ५१ पेजेसच्या ऐवजी त्यांना फक्त २२ पेजेसची माहिती मिळाली. मात्र इतर पेजेस त्यांना प्राप्त झाले नाहीत. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात एक धारिका अतिक्रमण विभागाकडे होती त्यातील २४ पेजेसची माहिती त्यांनी आता तयार करुन आणलेली आहे आणि सदरच्या २४ पेजेसची माहिती त्यांनी आयोगासमारे अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. आणि अपीलार्थीने ती आयोगापुढे स्विकृत केली. परंतू २४ पेजेसची माहिती उपलब्ध झाल्यानंतर ती विलंबाने मिळाल्यामुळे अपीलार्थीस ती विनामुल्य मिळावी अशी त्यांनी आयोगापुढे मागणी केली.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरल्यानंतर २२ पेजेसची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे २२ पेजेसच्या माहितीचे शुल्क अपीलार्थीस आकारणे संयुक्तिक होईल. आणि राहिलेल्या २४ पेजेसची माहिती अपीलार्थीस विलंबाने दिल्यामुळे विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलार्थीकडून २२ पेजेसच्या माहितीचे शुल्क घेऊन उर्वरीत शुल्क अपीलकर्त्यास परत करणे योग्य राहील म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस राहिलेल्या २४ पेजेसची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी उर्वरीत रक्कम ७ दिवसांचे आत अपीलार्थीस परत करावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७८४/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री प्रशांत शंकरराव बघेले<br>C/o, प्रशांत नामदेवराव कनेरे,<br>आजम, प्लॉट नं.२४, गल्ली नं.६, जवाहर नगर,<br>मानेवाडा, नागपूर-४४० ०२४. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य लेखा/वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी<br>वित्त विभाग, जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०७/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी वित्त विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दि.०३/०२/२०११ रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांनी नौकरीच्या राजिनामा संदर्भात दि.२७/०८/२०१० आणि दि.०८/१२/२०१० रोजी पत्र दिले होते त्या पत्रावर केलेल्या

कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. १०/०२/२०११ च्या पत्रान्वये माहिती प्राप्त करुन दिली परंतू त्या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि.१०/०३/२०११ रोजी मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी वित्त विभाग. जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतर देखील त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि. १३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी वित्त विभाग जिल्हा परिषद नागपूर श्री अ.क. मडावी हजर आहेत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य लेखा/वित्त अधिकारी श्री पी. पी. सव्वालाखे हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री मडावी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि. ०३/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने त्यांचा राजिनामा दि.१५/०५/२०१० च्या ऐवजी दि.२८/०४/२०१० ला मंजुर करण्याबाबत माहिती मागितली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.१०/०२/२०११ च्या पत्रान्वये राजिनामा मंजूर करण्याच्या दिनांकात बदल करण्या संदर्भातील कारण कोणते याबाबत माहिती देता येत नाही असे कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.२३/०३/२०११ रोजी घेण्यात येवून त्यावर निर्णय देण्यात आला. त्या निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्ता यांनी दि. २७/०८/२०१० आणि दि.०८/१२/२०१० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे त्यांचा वरिष्ठ सहायक पदाचा राजिनामा मंजूर करण्याबाबत दि.२३/०४/२०१० रोजी सादर केलेल्या अर्जाच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची विचारणा केली आहे. सदर्हु बाब ही प्रशासकीय स्वरुपाची असल्याने कायदे विषयक बाबींची पडताळणी करुन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल व त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल आणि त्याबाबतची प्रत संबंधिताला देता येईल असे नमुद केल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीच्या दि.२७/०८/२०१० आणि दि.०८/१२/२०१० च्या राजिनामा मंजूर करण्याच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या दि.२७/०८/२०१० आणि दि.०८/१२/२०१० च्या अर्जावर प्रथम अपीलात नमुद केल्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**<br>**राज्य माहिती आयुक्त**<br>**राज्य माहिती आयोग**<br>**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**<br>**निवड नस्ती.**

**उपसचिव**<br>**राज्य माहिती आयोग**<br>**खंडपीठ नागपूर**

मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र.७८२/नाग/२०११</u>**

१. श्री पँथर प्रकाश बन्सोड - **अपीलकर्ता**
अध्यक्ष भारतीय दलित पँथर
पँथर मुख्यालय उंटखाना चौक, डॉ. भदंत आनंद कौसल्यायन मार्ग, नागपूर-०९.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
राज्य अनुसुचित जाती आयोग कार्यालय,
प्रशासकीय इमारत, पहिला माळा, खान अब्दुल गफ्फारखान मार्ग,
वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
राज्य अनुसुचित जाती आयोग कार्यालय,
प्रशासकीय इमारत, पहिला माळा, खान अब्दुल गफ्फारखान मार्ग,
वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.

**(आदेश पारित दिनांक ०७/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०७/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी, राज्य अनुसूचित जाती आयोग मुंबई यांचेकडे दि.११/०२/२०११ रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांनी दि.२०/०७/२०१० रोजी अध्यक्षांकडे पोस्टाने तक्रार पाठविली होती. त्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती तसेच सन २००५ ते २००६ या कालावधीत राज्यातील अनुसुचित जातीच्या तक्रारकर्त्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारीचा निबटारा केलेल्या

प्रकरणांची संख्या, प्रलंबित प्रकरणांची संख्या त्याचप्रमाणे सन २००५ ते २००६ या कालावधीतील राज्यातील अनुसुचित जातीच्या झालेल्या अन्याय अत्याचाराबाबत सुमोटो आयोगाने दाखल केलेल्या प्रकरणांची संख्या तसेच आयोगातील इतर सदस्यांकडे प्राप्त झालेली प्रकरणे व निकाली काढलेली प्रकरणे इ. बाबत १ ते ३ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.०६/०४/२०११ रोजी कळविले की, आपला दि. २०/०७/२०१० चा तक्रार अर्ज आयोगाकडे प्राप्त झालेला दिसून येत नाही. तसेच मुद्या क्र. २ व ३ बाबत वर्षनिहाय माहिती संबंधित विभागाकडून प्राप्त करण्याची कार्यवाही असल्याने सदर अभिलेख्यांवरुन माहिती प्राप्त करण्यासाठी साधारणपणे एक महिन्याचा कालावधी लागणार आहे म्हणून सदरची माहिती अभिलेख्यावरुन प्राप्त  झाल्यावर आपणास पाठविण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले.त्यानंतर दि.२५/०५/२०११ च्या पत्रान्वये त्यांना मुद्या क्र.२ ची माहिती प्राप्त झाली आणि दि.१३/०५/२०११ च्या पत्रान्वये मुद्या क्र.३ ची माहिती प्राप्त झाली. मात्र २००५ ते २००६ या वर्षाची कोणतीही माहिती त्यांना प्राप्त झाली नाही आणि आयोगाचे सन्मानीय सदस्य आर्थिक व सामाजिक यांनी सुनावणी घेतलेल्या प्रकरणांची माहिती त्यांना मिळालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	जनमाहिती अधिकारी श्री डी. डी. देशमुख यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१५/०२/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती आयोगातील विविध विभागाशी संबंधित होती. त्यामुळे संबंधित विभागास संबंधित माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी कळविण्यात आले. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सन २००५ ते २०१० या कालावधीची असल्यामुळे सदरची माहिती संकलीत करण्यास बराचसा कालावधी प्रत्येक विभागास लागला. त्याचे कारण असे की, आयोगाचे प्रत्यक्ष कामकाज हे सन २००६ पासून सुरु झाले त्यामुळे अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कोणतीही माहिती त्यांच्या कार्यालयाकडे तयार नव्हती म्हणून आयोगाच्या प्रत्येक सदस्याकडील प्रकरणांची प्रकरणनिहाय माहिती संकलीत करण्यात आली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास दि.०२/०५/२०११ च्या पत्रान्वये आणि दि.१३/०५/२०११ च्या पत्रान्वये प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना २००५ आणि २००६ या वर्षाची माहिती प्राप्त झाली नाही तसेच आयोगातील सन्माननीय सदस्य (सामाजिक व आर्थिक) यांची माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून सदरची माहिती त्यांना प्राप्त होणे जरुरीचे आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी सांगितले की, सन्माननीय सदस्य (सामाजिक व आर्थिक) यांच्या संदर्भातील माहिती अपीलकर्त्यास त्याबाबतची खात्री करुन उपलब्ध करुन देण्याचे सन २००५ ते २००६ मध्ये आयोगाचे कामकाज सुरु

झाले नव्हते म्हणून सन २००५ ते २००६ या वर्षातील तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापी ही वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी सन्माननीय सदस्य (सामाजिक व आर्थिक) यांचेकडील माहितीची खात्री करुन अपीलार्थीस विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच सन २००५-२००६ या वर्षातील आयोगाचे प्रत्यक्ष कामकाज सुरु नसल्यामुळे तक्रारी आयोगाकडे प्राप्त नाही असे देखील स्पष्टपणे कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.८९७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री होमराज केशवराव खुसपरे<br>सचिव, ओम साईनाथ बाबा ग्रामीण विकास शिक्षण विद्या प्रसारक मंडळ, वाकी<br>मु. पो. वाकी.<br>ता. सावनेर जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त<br>ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर.<br>प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक<br>ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर<br>जुने सचिवालय, सिव्हील लाईन, नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०८/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१७/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०८/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२०/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक ॲंटी करप्शन ब्युरो नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांनी दि.२३/०३/२०११ रोजी सचिव / अध्यक्ष /संघटना/ संस्था/ वरिष्ठ अधिकारी यांची CBI तपासणी करुन भ्रष्टाचार विरोधी गुन्हा दाखल करण्याबाबत तक्रार अर्ज दिला होता. त्या तक्रार अर्जामध्ये शिक्षणाधिकारी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक जिल्हा परिषद नागपूर तसेच यशवंतबाबा शिक्षण संस्था बिछवा ता. सावनेर तसेच

रोहीत  बहुउद्येशिय सेवा विकास संस्था नागपूर यांच्या संदर्भात तक्रार अर्ज दिला होता. त्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या प्रती त्यांनी मागितल्या होत्या. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.१६/०५/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध झाली परंतू त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपायुक्त अँटी करप्शन ब्युरो नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.१६/०५/२०११ च्या पत्रान्वये दिलेली माहिती योग्य असल्याचे नमुद करुन सदरचे प्रथम अपील खारीज केले. म्हणून अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.   आज आयोगापुढे सुनावणीवेळी जनमाहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, ॲटी करप्शन ब्युरो श्री टि. के. रॉय यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२०/०४/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२८/०४/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सदरच्या माहितीच्या अर्जात त्यांच्या दि.२३/०३/२०११ च्या तक्रार संबंधात केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्ता यांचा दि.२३/०३/२०११ चा तक्रार अर्ज मा. पोलीस उपायुक्त ॲटी करप्शन ब्युरो नागपूर यांनी मा. महासंचलक ॲटी करप्शन ब्युरो महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे कार्यवाहीस्तव पाठविला आहे अशी माहिती अपीलकर्त्यास दि.१६/०५/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे सुनावणीचेवेळी त्यांनी मान्य केले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील पोलीस उपायुक्त ॲटी करप्शन ब्युरो यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.३१/०५/२०११ रोजी घेण्यात आली आणि अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य असल्याचे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढले असे श्री संदिप दिवान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्याचप्रमाणे श्री संदिप दिवान यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, महासंचलक अँटी करप्शन ब्युरो मुंबई यांनी अपीलकर्त्याचा तक्रार अर्ज मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे दि.०८/०७/२०११ च्या पत्रान्वये योग्य कार्यवाहीसाठी  पाठविला आहे. व त्याची प्रत अपीलार्थीस प्राप्त झालेली आहे. तसेच दि.०८/०७/२०११ च्या पत्राची प्रत देखील अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले.

४.   अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस त्यांच्या दि.२०/०४/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन

जनमाहिती अधिकारी यांनी दि.१६/०५/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.७९०/नाग/२०११**

१. श्री डॉ. विष्णू राजाराम वैरागडे - **अपीलकर्ता**
०८, न. प. शॉपींग काम्पलेक्स, देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी - **उत्तरवादी**
गडचिरोली.
ता. जि. गडचिरोली.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय, गडचिरोली
ता. जि. गडचिरोली.

**(आदेश पारित दिनांक ०८/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/०४/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०८/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार श्री खलाटे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सौ किरण कुळकर्णी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०७/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार गडचिरोली यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन कु. माधुरी भुसारी मडावी यांना प्रदान केलेल्या जातीच्या प्रमाणपत्रा बाबतच्या नस्तींची छांयाकित प्रत व इतर माहिती संदर्भात १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितली हाती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मुद्या क्र. ३ ची माहिती मिळाली मात्र मुद्या क्र. १, २, ४ ची

माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.०९/०२/२०११ रोजी उपविभागीय अधिकारी गडचिरोली यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देण्यात आला आणि प्रथम अपीलात १५ दिवसात माहितीचा शोध घेऊन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. परंतू त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार गडचिरोली श्री खलाटे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०७/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने वर नमुद केल्याप्रमाणे १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही कु. माधुरी भुसारी मडावी यांना प्रदान केलेल्या जात प्रमाणपत्राच्या नस्तींच्या संपूर्ण कागदपत्रांच्या संदर्भात होती. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सन १९८७-८८ च्या कालावधीतील आहे म्हणून अपीलार्थीस दि.२४/०१/२०११ च्या पत्रान्वये आपण माहितीच्या अर्जात कु. माधुरी भुसारी मडावी यांना सन १९८७-८८ च्या कालावधीत कोणत्या तहसिल मधून जात प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे याचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही त्यामुळे अर्जावरुन त्यांना गडचिरोली तहसिल मधूनच जात प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले किंवा नाही याचा उलगडा होत नाही म्हणून सात दिवसात सदरची माहिती या कार्यालयाकडे सादर करण्याचे कळविले.

मात्र अपीलार्थीने याबाबत कोणतीही माहिती कळविलेली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात सदरच्या अभिलेख्याचा शोध घेतला होता सदरचे अभिलेख त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध झाले नाही. तसेच सन १९८७-८८ या कालावधीत जात प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार हे नायब तहसिलदार यांना सुध्दा होते त्यामुळे सदर प्रमाणपत्र हे नेमके कोणत्या कार्यालयाकडून व कोणत्या अधिकाऱ्याचे स्वाक्षरी स्विकृत झाले आहे याबाबत स्पष्ट उलगडा होत नाही त्यामुळे सदर प्रकरणांचा शोध घेण्यास अडचण निर्माण होत आहे म्हणून सदर प्रमाणपत्राची प्रत अपीलकर्ता यांचेकडे उपलब्ध असल्यास ती प्रत या कार्यालयास पुरवावी असे अपीलार्थीस मुद्या क्र.१ व मुद्या क्र.२ च्या बाबत कळविले. आणि मुद्या क्र.३ च्या संदर्भातील माहिती म्हणजे शासन निर्णयाची प्रत अपीलार्थीकडून माहितीचे शुल्क भरणा करुन घेऊन प्राप्त करुन द्यावी असे देखील कळविले. आणि अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. ४ ची माहिती म्हणजे P1 पंजीची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयात असल्यामुळे त्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी अशी माहिती अपीलार्थीस दि.०४/०२/२०११ च्या पत्रान्वये देण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदर पत्र प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांनी आयोगासमोर मान्य केले. परंतू या माहितीने समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी गडचिरोली

यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि सुनावणीचा निर्णय दि.१५/०४/२०११ रोजी देण्यात आला आणि सदरच्या निर्णयात असे नमुद केले की, अपीलार्थीने मागितलेल्या जातीच्या प्रमाणपत्राचे प्रकरण शोधून आवश्यक असलेली कागदपत्रे अपीलार्थी यांना १५ दिवसात उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय निर्गमित केल्याचे उपविभागीय अधिकारी श्रीमती कुळकर्णी यांनी सांगितले.

प्रथम अपीलाच्या या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा पुन्हा कसून शोध घेतला त्या संदर्भात त्यांच्या स्तरावर शोध पथक तयार करुन सदर माहितीचा शोध घेण्यात आला. परंतू सदरची माहिती सुमारे २४ वर्षापूर्वीची असल्यामुळे शोध घेऊनही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलार्थीस पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी दि. २९/०४/२०११ च्या पत्रान्वये कळविल्याचे जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस दि. २४/०१/२०११ च्या पत्रान्वये आणि दि. ०४/०२/२०११ च्या पत्रान्वये आणि दि.२९/०४/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७९८/नाग/२०११, अपील क्र.७९९/२०११, अपील क्र.८००/२०११</u>**

१. श्री प्रकाश रामदेव जायस्वल - **अपीलकर्ता**
जय बम्लेश्वरी कंपाऊंड, जिल्हाधिकारी कार्यालय जवळ,
आमगाव रोड, फुलचुर, गोंदिया
ता. जि. गोंदिया.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष समाज कल्याण अधिकारी - **उत्तरवादी**
गोंदिया
ता. जि. गोंदिया.

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
डॉ. बाबासाहेब आम्बेडकर मुलांचे शासकीय वस्तीगृह, गोंदिया
ता. जि. गोंदिया.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष समाज कल्याण अधिकारी
गोंदिया
ता. जि. गोंदिया.

५. जनमाहिती अधिकारी
आर्थिक दृष्टया मागासवर्गीय मुलांची शासकीय वस्तीगृह, गोंदिया
ता. जि. गोंदिया.

६. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया.

७. जनमाहिती अधिकारी
विशेष समाज कल्याण अधिकारी कार्यालय, जि. प. गोंदिया ता. जि. गोंदिया.

**(आदेश पारित दिनांक ०९/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये अपील क्र. ७९८/२०११, ७९९/२०११ आणि अपील क्र. ८००/२०११ अशी तीन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांमध्ये माहितीचे स्वरुप एकच असल्याने अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सदर तीनही द्वितीय अपीलांच्या सुनावणीकरीता आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०९/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२१/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वस्तीगृह गोंदिया तसेच जनमाहिती अधिकारी, आर्थिक दृष्टया मागासवर्गीय मुलींचे शासकीय वस्तीगृह गोंदिया आणि जनमाहिती अधिकारी, विशेष समाजकल्याण अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे मुलांच्या शासकीय वस्तीगृहाच्या इमारतीला आणि मुलींच्या शासकीय वस्तीगृहाच्या इमारतीला कोणामार्फत जागा मिळाली आहे. आणि त्या जागेच्या दिलेल्या मोबदल्याबाबत त्यांनी माहिती मागितली होती. त्यांना विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी गोंदिया यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीमध्ये सदर जमिनीचा मोबदला कोणाला देण्यात आला आहे याबाबतची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी श्री मडावी तसेच विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गोंदिया श्री मोहबंशी हे उपस्थित आहेत. त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दोनही शासकीय वस्तीगृहाला जिल्हाधिकारी भंडारा यांचे कार्यालयाकडून दि.२८/११/१९८३ च्या आदेशाप्रमाणे शासकीय जमिन मिळाली आहे. सदरची जमिन ही शासकीय असल्यामुळे त्याबाबतचा कोणताही मोबदला कोणत्याही खाजगी व्यक्तीला देण्यात आलेला नाही. म्हणून याबाबत अपीलार्थीने

आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या मोबदल्याची माहिती त्यांना उपलब्ध करुन द्यावी म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वरील दोनही शासकीय वस्तीगृहांना जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडून शासकीय जमिन मिळाली असून कोणत्याही खाजगी व्यक्तीला जमिनीचा मोबदला दिला नाही असे अपीलार्थीस स्पष्टपणे विनामुल्य कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र.८९९/नाग/२०११</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुधाकर लक्ष्मणराव होकम<br>महेश नगर, तुकुम चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. ४४२ ४०१. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (मुल्यांकन व नियोजन)<br>चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, कार्यालय चंद्रपूर<br>सिव्हील लाईन, नागपूर रोड, चंद्रपूर-४४२ ४०१. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.०९/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. प्रस्तुत प्रकरणात कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलार्थीने जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक वनसंरक्षक चंद्रपूर वनवृत्त कार्यालय चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन सौ शोभा धात्रक, लेखापाल यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रत तसेच संगणक परिक्षा आणि इतर बाबींवर १ ते ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.१३/१२/२०१०

च्या पत्रान्वये १ ते ७ मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. तसेच प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थीने प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी वनवृत्त चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. सदर प्रथम अपीलाचा निर्णय दि.२८/०३/२०११ रोजी देण्यात आला आहे. त्यामध्ये असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून अपीलार्थीचे प्रथम अपील खारीज केल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता हे आज आयोगापुढे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. परंतू वर नमुद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.१३/१२/२०१० च्या पत्राने १ ते ७ मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यात येते.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९०१/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सारंग दाभेकर व इतर<br>रा. पो. चिमुर<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>वरोरा.<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १२/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०७/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी महसूल वरोरा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन चिमुर व वरोरा तालुक्यातील वनहक्क कायद्या अंतर्गत मंजूर जागेची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी तथा

तहसिलदार यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र फक्त चिमुर तालुक्याच्या संदर्भातील ५ मुद्यांची माहिती प्राप्त झाली. परंतू वरारो तालुक्याच्या संबंधित माहिती प्राप्त झाली नाही.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री जी. एच. भुगांवकर हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीनेही जनमाहिती अधिकारी यांनाच प्राधिकृत केले आहे.

जनमाहिती अधिकारी श्री भुगावकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. ०७/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१०/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने माहितीच्या अर्जात चिमुर तालुक्याच्या संदर्भात माहिती मागितली होती. त्यामुळे त्यांचा माहितीचा अर्ज तहसिलदार चिमुर यांचेकडे पाठविण्यात आला. आणि तहसिलदार चिमुर यांनी चिमुर तालुक्याची माहिती विनामुल्य अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली. तथापी अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जात अपीलार्थीने स्पष्टपणे वरोरा तालुक्याची माहिती नमुद केली नसल्यामुळे त्यांना ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे उपविभागीय अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यांनी माहितीचा अर्ज हा उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केला होता. आणि उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात चिमुर आणि वरोरा या तालुक्यांचे कार्यक्षेत्र आहे म्हणून त्यांनी त्यांच्याकडे माहिती मागितली होती. म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे देखील त्यांना वरोरा तालुक्याची माहिती देखील मिळणे आवश्यक आहे असे अपीलार्थीचे म्हणणे आहे म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असुन हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत उपविभागीय अधिकारी यांनी अपीलार्थीस वरोरा तालुक्याची माहिती निरिक्षणासाठी कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवावी. आणि अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात हजर झाल्यानंतर त्यांना माहितीचे निरिक्षण करण्यासाठी आवश्यक ते दस्तऐवज उपलब्ध करुन द्यावे. आणि निरिक्षण झाल्यानंतर अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२.       अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८०६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री प्रेमदास नामदेवराव सहारे<br>समादेशक सहायक<br>समादेशक कार्यालय, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.४,<br>हिंगणा रोड, नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, सदर, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १२/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.११/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१८/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रथम लीपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली दोन अर्ज सादर करुन

का अर्जामध्ये राज्य राखीव पोलीस बल गट क्र.४ नागपूर येथील कार्यालय तथा निवासस्थानाचे दुरुस्ती व प्राप्त अनुदान देखभाल संदर्भात खर्चाची मुद्या क्र. १ ते २ ची माहिती मागितली होती. त्याचप्रमाणे दुसऱ्या माहिती अर्जात राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ नागपूर येथील कॅम्प संदर्भात असलेल्या रस्त्याचे डांबरीकरण करुन मिळणेबाबत पत्र दिले होते. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२८/०३/२०११ च्या पत्रान्वये आणि दि.०५/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता विद्यमान जनमाहिती अधिकारी श्री भागचंदानी हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियांता श्री तावरे हे हजर होते.

विद्यमान जनमाहिती अधिकारी श्री भापचंदानी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचे दि.१८/१२/२०१० वरीलप्रमाणे दोनही माहितीचे अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाले होते. अपीलकर्त्याने मागितलेल्या महितीच्या संदर्भात तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन तांत्रीक शाखा १ यांचेशी माहिती संबंधित असल्याने त्यांच्याकडे माहितीचा अर्ज पाठवून त्यांच्याकडून माहिती संकलीत केली. तसेच अपीलकर्त्याच्य दुसऱ्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन अपीलार्थीस दि.०५/०१/२०११ च्या पत्रान्वये असे माहिती उपलब्ध दिली की, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.४, नागपूर येथील कॅम्प अंतर्गत असलेल्या रस्त्याचे डांबरीकरणा संबंधिचे पत्र उपविभागीय अभियंता, सा. बं. उपविभाग क्र.१, नागपूर यांचेकडे पाठविण्यात आलेले आहे. त्यांच्या मार्फत सदर कामे दुरुस्ती व देखभाल कार्यक्रमात अंतर्भूत करणे व त्यांची अंदाजपत्रके तयार करुन विभागीय कार्यालयास सादर करण्याबाबत प्रक्रिया सुरु आहे. तरी आपण या कार्यालयास व्यक्तिशः भेट देवून आाल्या शंकेचे निराकरण करावे असे कळविलेले आहे. त्याचप्रमाणे अपीलार्थीने मागितलेल्या दुसऱ्या माहितीच्या अर्जात नमुद केलेल्या माहितीच्या संदर्भात सद्य:स्थितीत जनहित याचिका न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्या बाबतची अभिलेखे उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे सादर केली आहेत. त्यामुळे सदर कामाच्या खर्चाची माहिती सादर करता येणे शक्य नाही असे अपीलार्थीस दि.२८/०३/२०११ च्या पत्रान्वये कळविलेले असून त्यामध्ये वित्तीय वर्ष २००६-०७ आणि २०१०-२०११ पर्यंत शासकीय कार्यालयीन व निवासी इमारतीकरीता प्राप्त अनुदान व झालेला खर्च देण्यात येत आहे. असे नमुद करुन शासकीय अनुदानातून इमारती करिता झालेल्या खर्चाची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलार्थीस दि.०५/०१/२०११ च्या पत्रान्वये आणि दि.२८/०३/२०११ च्या पत्राने पाठविलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र

अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या कॅम्पसमधील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम झालेली नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, प्रस्तुत प्रकरणात आता सन २०११-१२ करिता शासकीय इमारतीच्या विशेष दुरुस्तीचा कार्यक्रम अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ नागपूर यांचे कार्यालयाकडून मंजूर करण्यात आले आहे. पोलीस बल गट क्र.४ राज्य राखीव पोलीस यांच्या कॅम्पस्मधील एका रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास काही लांबी करिता मंजूरी मिळालेली आहे. आणि नियमाप्रमाणे आता त्यावर पुढील कार्यवाही करुन डांबरीकरणाचे काम हाती घेण्यात येईल असे कार्यकारी अभियंता श्री तोरणे यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलार्थीस ही वस्तुस्थिती कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असुन हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस वर नमुद केल्याप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक माहिती विनामुल्य कळवावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.८०८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दिलीप गजाननराव खेडीकर<br>नयापूरा, राम मंदिर जवळ, प्रेम नगर, वार्ड क्र.३४, नागपूर<br>नयापूरा, प्रेमनगर, नागपूर-२. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी<br>महानगर पालिका, सिव्हील लाईन, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक<br>आरोग्य विभाग (एम) महानगर पालिका, सिव्हील लाईन, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १२/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.११/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२४/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. अक्षिक्षक, आरोग्य विभाग (एम) महानगर पालिका सिव्हील लाईन्स नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन डॉ. नरेन्द्र बहेरवार, प्रोग्राम ऑफिसर यांच उपस्थितीत १६०९९ शालेय विद्यार्थी व विद्यार्थींनी वर केलेल्या रक्त तपासणी नुसार पॉझीटिव्ह रोगी आढळल्यास म.न.पा. आरोग्य विभागाद्वारे केलेल्या उपचारावर होणाऱ्या एकंदरीत खर्चा विषयीची एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू त्यांना अपेक्षित माहिती मिळाली

नाही म्हणून त्यांनी दि.०५/०२/२०११ रोजी आरोग्य विभागाकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी श्री ए. आर. खान यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२४/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती डॉ. नरेन्द्र बहीरवार, वैद्यकीय अधिकारी म.न.पा. यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती मागविण्यात आली. डॉ नरेन्द्र बहीरवार यांचेकडून दि.२८/१२/२०१० ला माहिती प्राप्त झाली. आणि सदरची माहिती अपीलार्थीस दि.०१/०१/२०११ च्या पत्रान्वये पाठविण्यात आली. मात्र सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली नसल्याचे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी दि.०१/०१/२०११ च्या पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाली. मात्र या माहितीमध्ये सिकलसेल आजाराच्या रुग्णांवर महानगर पालिकेने अद्यापपर्यंत औषधोपचारांवर कोणताही खर्च केला नाही अशी माहिती त्यांना उपलब्ध झाली आहे. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सिकलसेल सारख्या गंभीर आजारावर महानगर पालिकेने उपाययोजना करणे अत्यंत जरुरीचे आहे.

त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी श्रीमती सविता मेश्राम आणि प्रोग्राम अधिकारी डॉ बहीरवार यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, नागपूर महानगर पालिकेच्या क्षेत्रात सिकलसेल सारख्या गंभीर आजारावर उपचार करण्यासाठी सीकलसेल प्रकल्प तयार करण्याचे काम सुरु केले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, मेडीकल Ethic नुसार रुग्णांच्या वैयक्तिक स्वरुपाची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. कारण सदरची माहिती ही रुग्ण म्हणून त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्याने ती वैयक्तिक स्वरुपाची असते म्हणून अपीलार्थीस सिकलसेल रुग्णांच्या वैयक्तिक याद्या (नावांच्या) उपलब्ध करुन देता येणार नाही मात्र नगर पालिके तर्फे सिकलसेल रुग्णांच्या संबंधित करावयाच्या उपाय योजनांची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे शक्य आहे आणि त्या आजारावार औषधोपचार करण्याची कार्यवाही निश्चित करण्यात येईल. आणि सदरच्या प्रस्तावात मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानंतर या प्रस्तावाच्या अंमलबजावणीची कार्यवाही करण्यात येईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. म्हणून प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी डॉ. बहीरवार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, मेडीकल Ethic नुसार अपीलकर्त्यास सिकलसेल व इतर रुग्णांची वैयक्तिक माहिती किंवा त्या विद्यार्थ्यांच्या यादया उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र नगर पालिकेमार्फत सिकलसेल रुग्णांवर भविष्यात करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असुन हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी महानगर पालिका नागपूर यांनी यांनी अपीलार्थीस सिकलसेल रुग्णांच्या संदर्भात करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची व प्रकल्पांची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८०७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री जगन्नाथ बळवंतराव दलदले<br>प्लॉट क्र.१२, अयोध्यानगर बस स्टॉप, न्यु सुभेदार रोड,<br>मॉ भगवती मंदीर, गल्ली क्र.३, नागपूर-४४० ०२४ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जं.का.स.स.)<br>वनविभाग, सिव्हील लाईन, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी<br>वनविभाग रामटेक<br>ता. रामटेक, जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १२/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.११/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.३०/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी वनविभाग रामटेक यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन झाडे तोडण्याची परवानगी देतांना जमीन मालकाकडून लिहून घेतलेल्या हमी पत्रानुसार झाडे न लावल्यामुळे जमिन मालक श्री जितेन्द्र शंकरराव घुबे यांच्या संदर्भात १ ते ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२३/११/२०१० रोजी माहिती मिळाली परंतू सदर माहितीने समाधान झाले नाही म्हणून त्यांनी

दि.१४/०२/२०११ रोजी प्रथम अपील सहा. वनसंरक्षक (ज.का.स.स.) वन विभाग नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी रामटेक श्री एम. पी. जैस्वाल हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले होते.

जनमाहिती अधिकारी श्री जयस्वाल यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही क्षेत्र सहाय्यक रामटेक यांचेकडून मागविण्यात आलेली आहे. क्षेत्र सहाय्यक रामटेक यांनी दि.१५/११/२०१० अन्वये सदरची माहिती त्यांचेकडे सादर केली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. आणि त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दि.२३/११/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस १ ते ६ मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील सहाय्यक वनसंरक्षक यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेतली मात्र प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसत नाही. म्हणून याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी पाठविलेली दि.२३/११/२०१० ची माहिती मिळाल्याचे अपीलार्थीने मान्य केले. त्यावर अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, मौका चौकशी संदर्भात केलेला पंचानामा हा कायद्याला धरुन नाही. तसेच श्री जीतेन्द्र शंकरराव घुबे यांनी झाडे तोडून नवीन झाडे लावलेली नाही म्हणून त्याबाबत त्यांच्यावर कार्यवाही करावी. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे की, याबाबत पंचासमक्ष मौका पंचनामा नोंदविण्यात आला त्यावरुन असे निदर्शनास येते की, खसरा धारकांकडून मागील तीनही वर्षाच्या पावसाळयात प्रतीवर्षी ५० ते ६० झाडे लावण्यात आली. परंतू तीनही पावसाळयात सदर झाडे जगली नाही म्हणून त्याबाबतची मौका पंचनाम्याची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू केलेला पंचनामा योग्य नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. मात्र केलेल्या पंचनाम्याच्या गुणवत्ते संदर्भाची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. त्याबाबत अपीलार्थीने योग्य त्या समक्ष अधिकाऱ्याकडे दाद मागणे योग्य राहील. तथापी अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती मुद्येनिहाय उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.८५८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अजय आर. मिश्रा<br>६१, रतन नगर, मानकापूर, नागपूर<br>ता. जि. नागपूर-३० | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा वाहतुक अभियंता<br>नागपूर महानगर पालिका, नागपूर<br>सिव्हील लाईन्स नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>वाहतुक विभाग<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १९/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१९/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२५/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, वाहतुक विभाग नागपूर महानगर पालिका नगापूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन VIP रोड वरील चैनलाईजर डिव्हाईडर, आणि फुटपाथवर हिरमुंजी लावण्यासंबंधि ABCD या स्वरुपात एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे

समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि.२५/०३/२०११ रोजी वाहतुक अभियंता म.प.पा. नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१९/०४/२०११ रोजी देण्यात आला. परंतू त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, नागपूर म.न.पा. श्री अजय डहाके हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा वाहतुक अभियंता, नासीर खान हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री अजय डहाके यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२५/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यावेळी त्यांच्या कार्यालयाकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती त्यांनी दि.१६/०३/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. आणि सदरच्या माहितीमध्ये मुद्या क्र. A बाबत असे कळविण्यात आले की, आपण त्यांच्य कार्यालयाकडे नस्तीचे निरिक्षण करण्यासाठी उपस्थित राहून माहितीचे शुल्क भरुन घेऊन माहिती प्राप्त करुन घ्यावी आणि मुद्या क्र. B.C.D. बाबत माहिती उपलब्ध नाही असे त्यांना कळविण्यात आले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील वाहतुक अभियंता यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१९/०४/२०११ रोजी निर्गमित करण्यात आला आणि त्यामध्ये अपीलार्थीस उपलब्ध असलेली माहिती देण्याबाबत आदेश दिले असे श्री खान यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दि.१६/०३/२०११ च्या पत्रान्वये आणि प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दि.२५/०४/२०११ च्या पत्रान्वये इतर विभागाकडून प्राप्त झालेली माहिती देखील उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. मात्र प्रस्तुत प्रकरणात कामाचे जे दर निर्धारीत केले आहे त्याच्या पृथककरणाची माहिती त्यांना मिळालेली नाही. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार सदरच्या नस्तीचे अवलोकन केले असता त्या नस्तीमध्ये दराच्या पृथकरणाची माहिती दिसून येत नाही. म्हणून ही वस्तुस्थिती अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत अपीलार्थीस दराच्या पृथकरणाची माहिती नस्तीमध्ये उपलब्ध नाही असे स्पष्टपणे विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने किंवा व्यक्तीशः कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.८१२/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री जर्नादन गुलाबराव मुन<br>केंद्रीय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच<br>७९१, नागसेनवन , नागपूर-१७. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव<br>भारतीय बाल विकास समाज नागपूर<br>C/o, जिजामाता माध्यमिक विद्यालय, बुटीबोरी जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>जिजामाता माध्यमिक विद्यालय, बुटीबोरी, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १३/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.११/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१३/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २१/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिजामाता हायस्कुल बुटीबोरी यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जिजामाता हायस्कुल येथील शिक्षक कर्मचाऱ्यांची माहिती मागितली होती.

आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री मिन्नात महादेवराव तितरमारे यांनी अपीलार्थी श्री जर्नादन गुलाबराव मुन यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन आवश्यक ती माहिती अपीलार्थीस आयोगापुढे उपलब्ध करुन दिली. सदर माहिती अपीलार्थीने स्विकृत करुन समाधान व्यक्त केले. आणि त्यांच्या माहिती अर्जाप्रमाणे संपूर्ण माहिती मिळाल्याचे त्यांनी स्पष्ट केले म्हणून अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती प्राप्त झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८१३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजेंद्र रामकृष्णराव मामुलकर<br>विठ्ठल रुख्मिनी मंदिराजवळ, गितानगर, झिंगाबाई टाकळी, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर मुख्य सचिव (वने)<br>महसूल व वन विभाग,<br>मंत्रालय मुंबई-३२. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी (वने)<br>महसूल व वन विभाग,<br>मंत्रालय मुंबई-३२. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १३/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.११/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१३/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.११/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी (वने) महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण नागपूर (MAT Nagpur) यांचेकडील मुळ अर्ज क्रमांक ९३/२००८ मध्ये मा. वन संरक्षक उत्तर चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर यांनी दि.१३/०८/२००८ रोजी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्या प्रतिज्ञा पत्राच्या अनुषंगाने अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन) महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी दि. १५/०२/२०११ अन्वये वन विभागातील सर्वेक्षकांच्या

भरतीसाठी शैक्षणिक अर्हता नसलेल्या उमेदवारांची यादी शासनाकडे सादर केली. त्यावर काय कार्यवही करण्यात आली याबाबतची माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.१८/०४/२०११ रोजी उपसचिव महसूल व वनविभाग यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यांना प्रथम अपीलाच्या सुनावणीचे पत्र उशीरा प्राप्त झाले म्हणून म्हणून ते सुनावणीकरीता उपस्थित राहू शकले नाही मात्र त्यांना दि.१५/०२/२०११ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात असे कळविण्यात आले की, शासनाने दि.२९/०३/२०११ च्या पत्रान्वये काही मुद्यांवर अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन) महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडून माहिती मागविण्यात आली आहे आणि सदर पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. मात्र ठोस स्वरुपात कोणतीही कार्यवाही झालेली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (वने) मंत्रालय मुंबई श्रीमती छाया सुनिल अग्निहोत्री ह्या उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव (वने) यांचे वतीनेही त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले आहे.

जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्रीमती छाया अग्निहोत्री यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.११/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१७/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दि.२९/०३/२०११ रोजी अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडून दि. १५/०२/२०११ च्या पत्रास अनुसरुन काही मुद्यांवर माहिती मागविली होती. म्हणून सदरची प्रत अपीलार्थीस ४ जुन २०११ च्या पत्रान्वये पाठविण्यात आले. परंतू अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्या कार्यालयाकडून अदयाप त्या मुद्यांवर माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तथापी शासनाकडील दि.२९/०३/२०११ च्या पत्रातील मुद्यांना अनुसरुन अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी राज्यातील मुख्यवन संरक्षक, औरंगाबाद, पुणे, नाशिक, ठाणे, यवतमाळ आणि वन संरक्षक चंद्रपूर व कोल्हापूर यांचेकडून एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. त्या पत्राची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सादर केली. म्हणून अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांचेकडून शासनाकडे दि.२९/०३/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेल्या मुद्यांवर माहिती प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर त्या बाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल आणि त्या बाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात येईल

असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. आणि सदरच्या माहितीबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे असेही जनमिाहती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलार्थीस दि.२९/०३/२०११ च्या पत्रान्वये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडून काही मुद्यांवर माहिती मागितली आहे त्या पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याला अनुसरुन अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक यांनी राज्यातील सर्व मुख्य वन संरक्षकांकडून १ ते ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. म्हणून अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक यांचेकडून शासनाकडे दि.२९/०३/२०११ च्या पत्रान्वये मागविलेल्या मुद्यांची माहिती प्राप्त झाल्यावर शासन स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल व तशी वस्तुस्थिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मजूंर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडून दि. २९/०३/२०११ च्या पत्रान्वये मागविलेल्या मुद्यांवर माहिती प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस कळविण्यात येईल असे स्पष्टपणे अपीलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने लेखी कळवावे. आणि त्या पत्रासोबत अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक यांचेकडील ३० एप्रिल २०११ च्या सर्व मुख्य वन संरक्षकांना लिहिलेल्या ज्ञापनाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

PTO

२.		अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८२१/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रामराव संतोषराव पाटे<br>मु. पो. आष्टी<br>ता. आष्टी जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापक<br>आष्टी सहकारी खरेदी विक्री संस्था लि. आष्टी<br>ता. आष्टी जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>आष्टी सहकारी खरेदी विक्री संस्था लि. आष्टी<br>ता. आष्टी जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.११/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१४/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२०/०७/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी, आष्टी तालुका सहकारी खरेदी विक्री संस्था यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन आष्टी सहकारी खरेदी विक्री संस्थेच्या झालेल्या गैरव्यवहाराबद्यल व इतर मुद्यांबाबत १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. परंतू त्या माहितीने अपीलार्थीचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीहल सहाय्यक निबंधक सहकारी संस्था वर्धा यांचेकडे केले. सहाय्यक निबंधकांनी संस्थेस माहिती

देण्याबाबत कळविले. परंतू संस्थेने दिलेल्या माहितीच्या संदर्भात पुढील कार्यवाही झालेली नसल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, आष्टी ता. सहकारी खरेदी विक्री संस्था श्री म्हात्रे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२०/०७/२००९ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही जुनी असल्यामुळे माहिती काढण्यास अवधी लागेल म्हणून अपीलार्थीस दि.२६/०८/२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यानंतर अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि सदरची माहिती अपीलार्थीस दि.२५/०९/२००९ च्या पत्रान्वये प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात रकमा वसूलीची कार्यवाही किंवा तोटा भरुन काढण्याची कार्यवाही झालेली नाही असे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. मात्र माहितीच्या अधिकारात माहिती उपलब्ध करुन देण्यात येत असते उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलार्थीने कार्यवाहीच्या संदर्भात योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागण योग्य होईल तथापी अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८२२/नाग/२०११</u>**

१. श्री भिमराव भेमटु टेंभुर्णे - **अपीलकर्ता**
विदर्भ हाऊसिंग कॉलनी
C/o, हनुमान मंदिराच्या मागे, जि. प. चौक, भंडारा
ता. जि. भंडारा.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक - **उत्तरवादी**
आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर
माताकचेरी जवळ, श्रध्दानंद पेठ, नागपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी - **उत्तरवादी**
आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर
माताकचेरी जवळ, श्रध्दानंद पेठ, नागपूर.

**(आदेश पारित दिनांक १४/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २४/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.११/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१४/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा नागपूर श्री एन. एम. ठाकरे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले आहे.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१८/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री पौनीकर अधिक्षक, उपसंचालक कार्यालय नागपूर यांची व इतर कर्मचारी अशी एकूण ८ कर्मचाऱ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रत मागितली होती. त्याच प्रमाणे बिंदु नामावलीची आणि रोस्टर रजिस्टरची माहिती मागितली होती.

त्याला अनुसरुन त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२८/०३/२०११ च्या पत्रान्वये माहिती प्राप्त झाली मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसंचालक नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा नागपूर श्री एन. एम. ठाकरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१८/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि.२८/०३/२०११ रोजी पंजीबध्द डाकेने माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. सदरच्या माहितीमध्ये अपीलकर्ता यांनी ८ कर्मचाऱ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रत मागितली होती. त्याला अनुसरुन सहा कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे अपीलार्थीस कळविण्यात आले आणि श्री मॉडेलवार व श्री अनंतवार यांचे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध आहे अशी माहिती त्यांना देण्यात आली. सदरचे दि.२८/०३/२०११ चे माहितीचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र श्री मॉडेलवार व श्री अनंतवार यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रत त्यांना मिळाली नाही म्हणून या दोघांच्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रत, त्याचप्रमाणे रोस्टरची प्रत देखील अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे उपलब्ध करुन दिली. अपीलार्थीने श्री मॉडेलवार आणि श्री अनंतवार यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रत आणि रोस्टरची प्रत आयोगापुढे स्विकृत केली.

४. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलार्थीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८२३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भिमराव भेमटु टेंभुर्णे<br>विदर्भ हाऊसिंग कॉलनी<br>C/o, हनुमान मंदिराच्या मागे, जि. प. चौक, भंडारा<br>ता. जि. भंडारा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक<br>आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर<br>माताकचेरी जवळ, श्रध्दानंद पेठ, नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी<br>आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर<br>माताकचेरी जवळ, श्रध्दानंद पेठ, नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.११/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१४/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. ०४/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा नागपूर मंडळ यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन १) जानेवरी २०१० ते आजपर्यंत सहाय्यक अधिक्षक पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांच्या आदेशाची प्रत, शासन निर्णय प्रत २) जानेवारी १९८६ ते डिसेंबर १९८६ पर्यंत सेवेत लागलेल्या कनिष्ठ लिपीकांना कोणत्या वर्षात कालबध्द पदोन्नती देण्यात आली त्या आदेशाची प्रत व शासन निर्णयाची प्रत. ३) अनुसुचित जातीच्या कनिष्ठ लिपीक कर्मचाऱ्यांना वरिष्ठ लीपीकाची पदोन्नती खुल्या प्रवर्गात देण्यात आली त्या आदेशाची प्रत व शासन

निर्णयाची प्रत अशी एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांनी दि.२२/१२/२०१० रोजी माहितीच्या शुल्काचा भरणा केला व त्यांना ३१ पेजेसची माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसंचालक यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा नागपूर मंडळ श्री एन. एम. ठाकरे हे उपस्थित आहेत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक यांचे वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले आहे.

जनमाहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा नागपूर मंडळ श्री एन. एम. ठाकरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०४/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१०/११/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली. आणि अपीलार्थीस दि.०१/१२/२०१० रोजी पत्र पाठवून माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले त्याला अनुसरुन अपीलार्थीने दि.२२/१२/२०१० रोजी माहितीच्या शुल्काचा भरणा केला. आणि जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली ३१ पानांची माहिती अपीलार्थीस त्याचदिवशी दिली. त्यानंतर अपीलार्थीने दि.११/०४/२०११ रोजी उपसंचालक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला त्याला अनुसरुन अपीलार्थीस पुन्हा दि.१३/०५/२०११ च्या पत्रान्वये ८ पेजेसची माहिती रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती देखील अपीलकर्त्यास दि.१८/०५/२०११ रेजी प्राप्त झाली त्याची पोच देखील जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली.

४. जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२२/१२/२०१० रोजी आणि दि.१३/०५/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने आयोगापुढे मान्य केले. मात्र मुद्या क्र. १,२,३ च्या संदर्भात पदोन्नतीबाबत शासन निर्णयाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेल्या मुद्या क्र. १,२,३ च्या संदर्भात ज्या पदोन्नती दिलेल्या आहेत त्या नियमानुसार दिलेल्या आहेत. म्हणून या पदोन्नती ज्या आधारे देण्यात आलेल्या आहेत त्याची वस्तुस्थिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून सात दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मुद्दा क्र. १, २ आणि ३ च्या संदर्भात ज्या पदोन्नती देण्यात आल्या आहेत त्या पदोन्नती ज्या आधारे देण्यात आल्या त्या संदर्भातील वस्तुस्थिती विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९०६/नाग/२०११</u>**

| | | |
|---|---|---|
| १. श्री अरुण अमृत गवई<br>सी पी डब्ल्यू डी क्वार्टर नं. २७, टाईप-३ (जुना)<br>सिव्हील लाईन्स, नागपूर -४४० ००१. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | |
|---|---|---|
| २. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>अकोला जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला. | - | **उत्तरवादी** |
| ३. जनमाहिती अधिकारी<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय, अकोला<br>जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १५/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१५/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१७/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अकोला यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांच्या दि.१०/०२/२०११ च्या आणि दि.१२/०२/२०११ पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती आणि इतर माहिती संदर्भात १ ते ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.०७/०३/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे म्हणून प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती पुरविणे अपेक्षित नाही. तसेच नायब तहसिलदार अकोला यांचे

फाईलवरील प्रकरण क्रमांक RTS६२/लोणाग्रा दि.२०/०८/०९ नायब तहसिलदार बारसी टाकळी यांचेकडे हस्तांतरीत करण्याबाबत कार्यालयाकडून आदेश पारित केले असून याबाबत कार्यालयीन पत्र दि.०३/०२/२०११ नुसार कळविले आहे आणि त्या आदेशाची प्रत सुध्दा पाठविलेली आहे.

उपरोक्त प्रकरणात आपण नायब तहसिलदार यांचेकडे उपस्थित राहून आपली बाजू मांडावी. तसेच कार्यालयीन पत्र दि.०३/०२/२०११ नुसार तहसिलदार अकोला यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल सद्यस्थितीत अप्राप्त आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे दाखल केले. परंतू प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता कनिष्ठ लिपीक श्री अनिल वानखेडे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी श्री रंजन जाधव शिरस्तेदार हे हजर आहेत.

त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१७/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२३/०२/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीस दि.०७/०३/२०११ च्या पत्रान्वये पत्रात नमुद केलेल्या मुद्यांवरील माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे म्हणून माहिती अधिकारात उपलब्ध असलेली माहिती पुरविणे अपेक्षित आहे म्हणून प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देता येत नाही असे कळविले. आणि त्याच पत्रामध्ये नायब तहसिलदार अकोला यांच्या फाईलवरील प्रकरण क्र.RTS / लोणाग्रा/दि. २०/०८/२००९ नायब तहसिलदार बार्शी टाकळी यांचे कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्याबाबत आदेश पारित केले असून त्या बाबत दि.०३/०२/२०११ नुसार कळविलेले आहे व आदेशाची प्रत सुध्दा पाठविलेली आहे. तसेच दि.०३/०२/२०११ नुसार तहसिलदार अकोला यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल अदयाप प्राप्त झालेला नाही अशी माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला दिसून येत नाही.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीच्या दि.१७/०२/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि.०७/०३/२०११ च्या पत्रान्वये उत्तर पाठविलेले आहे.

तथापी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येत नाही. परंतू अपीलकर्त्याच्या दि.१०/०२/२०११ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच इतर मुद्यांबाबतही वस्तुस्थिती कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या दि.१०/०२/२०११ च्या पत्रावर केलेली कार्यवाहीची तसेच माहिती अर्जातील २ ते ५ मुद्यांबाबतची मुद्येनिहाय माहिती किंवा त्याबाबतची वस्तुस्थिती विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे. आणि भविष्यात त्यांनी याची पुनरावृत्ती करुन नये अशी समजही त्यांना देण्यात येत आहे.

३. सदर निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे उपविभागीय अधिकारी अकोला यांचेकडे पाठविण्यात येत आहे.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८३०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सदानंद श्रावणजी गणवीर<br>अंबिका नगर, यवतमाळ<br>ता. जि. यवतमाळ-४४५००१. | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक<br>उपवनसंरक्षक कार्यालय यवतमाळ<br>ता. जि. यवतमाळ. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक<br>उपवनसंरक्षक कार्यालय यवतमाळ<br>ता. जि. यवतमाळ. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १५/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले होते. परंतू सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी राज्य माहिती आयुक्त नागपूर यांचेकडे घेण्यासाठी मा. मुख्य राज्य माहिती आयुक्त मुंबई यांच्या दि.०६/०५/२०११ च्या आदेशाला अनुसरुन सदर द्वितीय अपीलाची सुनावणी घेण्यासाठी राज्य माहिती आयोग नागपूर या कार्यालयाकडून दि. १६/०८/२०११ रोजी नोटीस काढून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना दि.१५/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१६/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक यवतमाळ यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्री बी. झेड. पवार वनपाल यांच्या संदर्भात त्यांची बदली झाल्यानंतर कार्यमुक्त करण्यात आलेल्या आदेशाची प्रत व त्यांना

किती वेळा निलंबीत केले आहे याबाबतची माहिती आणि त्यांच्या सेवादुरुस्तीची प्रत त्यांनी मागितली होती. त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना माहिती प्राप्त झाली. परंतू त्यांच्या सेवा पुस्तिकेची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक यवतमाळ श्री मराठे हे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.१६/०६/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही वन परिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक घाटंजी व आस्थापना शाखा यांचेशी संबंधित असल्याने त्यांच्याकडून दि.२१/०६/२०१० च्या पत्रान्वये मागविण्यात आली. त्यानुसार दि. २६/०६/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र श्री बी. झेड. पवार यांच्या सेवा पुस्तिकेची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलार्थीने श्री बी. झेड. पवार यांच्या सेवा पुस्तिकेची प्रत मागितली आहे मात्र सदरची माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे त्रयस्थपक्षाचे म्हणणे ऐकून प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद केल्याप्रमाणे अपीलार्थीस सेवा पुस्तिकेची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी त्रयस्थपक्षाचे म्हणणे ऐकून त्यांच्या सेवा पुस्तिकेची प्रत अपीलार्थीस विनामुल्य पुरविण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८३१/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सदानंद श्रावणजी गणवीर<br>अंबिका नगर, यवतमाळ<br>ता. जि. यवतमाळ-४४५००१. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक<br>उपवनसंरक्षक कार्यालय, वनविभाग यवतमाळ<br>ता. जि. यवतमाळ. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.)<br>वनविभाग यवतमाळ<br>चर्च रोड, ता. जि. यवतमाळ. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १५/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले होते. परंतू सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी राज्य माहिती आयुक्त नागपूर यांचेकडे घेण्यासाठी मा. मुख्य राज्य माहिती आयुक्त मुंबई यांच्या दि.०६/०५/२०११ च्या आदेशाला अनुसरुन सदर द्वितीय अपीलाची सुनावणी घेण्यासाठी राज्य माहिती आयोग नागपूर या कार्यालयाकडून दि. १६/०८/२०११ रोजी नोटीस काढून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना दि.१५/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २५/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) वन विभाग यवतमाळ यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन खालीलप्रमाणे दोन मुद्यांवर माहिती मागितली होती.

१) आपल्या कार्यालया अंतर्गत १ मार्च २००८ पर्यंत तसेच १ जानेवारी २००९ ते ६ एप्रिल २००९ पर्यंत जारी करण्यात आलेल्या सर्वच रहदारी पासची मला प्रत्यक्ष पाहण्याकरिता व त्यानंतर माझ्या आवश्यकतेच्या मागणीनुसार रहदारी पासची छायांकित प्रत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात यावी.

२) आपल्या कार्यालयास माझा माहितीचा अधिकार अंतर्गत विनंती अर्ज दिनांक २८/०४/२००९ रोजीच्या नुसार अर्जातील नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक कामाची माझ्या समवेत प्रत्यक्ष पाहणी करुन पाहणी अहवाल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावी. अशाी प्रकारची माहिती मागितलेली आहे.

अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मुद्या क्र. २ ची माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र मुद्या क्र.१ ची माहिती त्यांना अदयाप मिळालेली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

३. आज आयोगापुढे विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी श्री मोहम्मद नय्यर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन अपीलार्थीस त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्र.२ ची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली आहे. मात्र अपीलार्थीने मुद्या क्र.१ मध्ये २ वर्षाची माहिती मागितलेली आहे. आणि सदरच्या माहितीचे स्वरुप हे फार मोठया प्रमाणात असल्यामुळे व अपीलार्थीस ते प्रत्यक्ष पाहणी करावयाची असल्यामुळे सदरची माहिती ३० दिवसात उपलब्ध करुन देण्यास जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले. म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्दा क्र.१ ची माहिती प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र.८३९/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रामदास सखारामजी काळे<br>आलेसुरचक (नैनपूर) पो. रत्नापूर, व्हाया नवरगांव<br>ता. सिन्देवाही जि. चंद्रपूर-४४१ २२३. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ६ द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती सिन्देवाही<br>ता. सिन्देवाही जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी<br>पंचायत समिती सिन्देवाही<br>ता. सिन्देवाही जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक १६/०९/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१६/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२७/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती सिंदेवाही जि. चंद्रपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन सुधारित वेतन निश्चिती संदर्भात आणि देये थकबाकी मिळणे बाबत त्यांनी माहिती मागितली होती.

परंतू त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती सिंदेवाही यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री मेश्राम हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी श्री तोडेवार हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२७/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलार्थीने सदरच्या माहिती अर्जात मागितलेल्या माहिती बाबत निश्चित स्वरुपात बोध होत नसल्यामुळे अपीलार्थीस दि.११/१०/२०१० रोजी पत्र पाठवून प्रत्यक्ष कार्यालयात येवून हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यास कळविले. त्याप्रमाणे अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात हजर झाले आणि त्यांना पाहिजे असलेली माहिती दाखविण्यात आली. मात्र त्यानंतर अपीलार्थीने पुन्हा संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि सुनावणीचेवेळी लेखाशाखेचे संबंधित लिपीक आणि अपीलकर्ता यांना त्यांच्या समक्ष बसवून अपीलकर्ता यांच्या वेतन निश्चिती आणि थकबाकीच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात आली. तसेच त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलार्थीस ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत पेन्शन मिळण्याचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथ) चंद्रपूर यांचेकडे दि.२४/०५/२०११ रोजी पाठविलेला आहे. त्यांच्याकडून प्रस्ताव मंजूर झाल्यावर अपीलार्थीस सुधारित दराने पेन्शन अदा करण्यात येईल असे सांगितले. त्यावर अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांचा प्राथमिक शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयाकडे सुधारीत दराने पेन्शन मिळण्याबाबतचा अहवाल त्यांना निरिक्षण करावयाचा आहे म्हणून अपीलार्थीने संवर्ग विकास अधिकारी यांचे कार्यालयात हजर राहून प्रस्तावाचे निरिक्षण करुन घेणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दि.२१/०९/२०११ रोजी संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या कार्यालयाकडे कार्यालयीन वेळेत उपस्थित रहावे आणि संबंधित जनमाहिती अधिकारी व संबंधित पेन्शन विभागाचे लिपीक यांनी अपीलार्थीस वर नमुद केलेला त्यांचा प्रस्ताव निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावा.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(पी डब्ल्यू पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८३५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजाखान महेबुब खान<br>द्वारा डायमंड गॅस हाऊस, शॉप नं. ५, छोटी मस्जीद कॉम्प्लेक्स<br>सदर बाजार, नागपूर- ४४० ००१. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक<br>महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, मर्या. मुंबई<br>कृपानिधी, ९ वालचंद हिरामंद मार्ग, बेल्लार्ड इस्टेट,<br>मुंबई-४००००१. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा विभागीय उपव्यवस्थापक<br>महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, मर्या. नागपूर<br>पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड, रामदासपेठ, नागपूर-१२ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.१६/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. आज आयोगापुढे सुनावणीकरीता अपीलार्थी गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री अलोणी आणि विद्यमान जनमाहिती अधिकारी श्री सुर्यवंशी हे आज आयोगापुढे हजर आहेत. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक हे आजारी असल्यामुळे हजर राहिलेले नाही त्याबाबत त्यंनी वैद्यकीय प्रमाणपत्र आयोगाकडे पाठविले आहे असे विभागीय व्यवस्थापक श्री शहा यांनी सांगितले.

३. तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री अलोणी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.०४/०३/२०११ चा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने खालीलप्रमाणे ४ मुद्यांवर माहिती मागितली होती.

१. महामंडळाच्या दि.३१/०१/२०११ च्या आणि दि.१७/०२/२०११ च्या जाहीर परिपत्रकाची सत्यप्रत.

२. सदरील पत्रकानुसार महामंडळाचे वतीने घेण्यात आलेल्या अहवालाची सत्यप्रत.

३. रेल्वे रँक द्वारे कोळसा वाहतुकीच्या कार्याकरीता नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदाराचे करारनाम्याचि सत्यप्रत.

४. रेल्वे रँक द्वारे SECL कोळसा कंपनी कडून वाहतुक करण्यात येणारा कोळसा कोणकोणत्या रेल्वेस्थानकापर्यंत वाहतुक करण्यात येणार आहे त्या रेल्वेस्थानकाचे नाव.

अपीलार्थीने अशा प्रकारची एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपीलार्थीने माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती संबंधित विभागाकडून प्राप्त करण्यासाठी संबंधित विभागाला कळविण्यात आले आणि अपीलार्थीस दि.२८/०३/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण मागितलेली माहिती ही संबंधित विभागाकडून प्राप्त करण्यासाठी संबंधित विभागाला कळविण्यात आले आहे. आणि माहिती प्राप्त होताच आपणास विनाविलंब देण्यात येईल असे अपीलार्थीस तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी कळविले आहे. त्यानंतर संबंधित विभागाने जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध करुन दिली. आणि अपीलार्थीस मुद्या क्र. १ आणि ३ ची माहिती दि.२९/०४/२०११ च्या पत्रान्वये एकूण १८ पेजेस माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविली आणि मुद्या क्र.२ आणि मुद्या क्र.४ च्या संदर्भात असे कळविले की, विभागीय व्यवस्थापक नागपूर यांनी दि. ०२/०९/२०१० रोजी मा. व्यवस्थापकीय संचालक यांना सादर केलेला विस्तृत अहवाल व कार्यपध्दती आणि त्या अनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक यांनी दि.०४/०२/२०११ रोजी निर्गमित केलेल्या स्वहस्ताक्षरातील सुचना व निर्णय

ही बाब महामंडळाचे कार्यालया अंतर्गत पत्रव्यवहार व गोपनीय असल्याने ते देता येत नाही असे दि.२९/०४/२०११ चे पत्रान्वये कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील महाव्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मुंबई यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि. ०४/०३/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि.२८/०३/२०११ च्या पत्रान्वये माहिती संकलीत करण्यात येत असून ती संकलीत झाल्यानंतरच देता येईल असे कळविलेले आहे. आणि माहिती संकलीत झाल्यावर दि. २९/०४/२०११ च्या पत्रान्वये मुद्या क्र.१ व ३ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस असे कळविले की, मुद्या क्र.२ आणि ४ च्या माहिती बाबत सदरची बाब ही महामंडळाचे कार्यालया अंतर्गत पत्रव्यवहार असून गोपनीय स्वरुपाचे असल्यामुळे ते पुरविता येत नाही असे कळविलेले आहे. तथापी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ मधे नमुद केलेल्या बाबीं संबंधात फक्त माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद केलेला आहे. म्हणून महामंडळाने केलेला अतंर्गत पत्रव्यवहार व त्या संदर्भात नमुद केलेल्या निर्णयाबाबतच्या टिपणी ह्या कोणत्याही गोपनीय स्वरुपाच्या दिसून येत नाही. उलटपक्षी महामंडळाच्या कामकाजातील पारदर्शीपणा जनतेस दिसून येण्यासाठी अपीलार्थीने मुद्या क्र.२ व ४ मधील मागितलेली माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन देणे न्यायोचित व संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मुद्या क्र.२ व ४ बाबतची संपूर्ण माहिती विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थीने प्रथम अपील महाव्यवस्थापक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मुंबई यांचेकडे दाखल केले होते. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र.............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.८३८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री त्रिंबकराव निळकंठ बंगाळे<br>संकटमोचन हनुमान मंदीर समोर, गणेशपेठ, मॉडेल मिल चौक, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक (नगर रचना)<br>नागपूर सुधार प्रन्यास नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रचना)<br>नागपूर सुधार प्रन्यास नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अवये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता यांचे वतीने श्री दलदले हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचे वतीने हजर असलेले श्री दलदले यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०९/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (रचना) नागपूर सुधर प्रन्यास नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन नायब तहसिलदार नझुल विभाग नागपूर यांच्या

दि.०५/०३/१९९७ च्या पत्रावर त्यांच्या कार्यालयाने सादर केलेल्या अभिप्रायाची किंवा मोक्का चौकशी अहवालाची छांयाकित प्रत मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२२/०३/२०११ च्या पत्रान्वये आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात या विभागाच्या अभिलेखात धारिका उपलब्ध नसल्याने सदर दस्तऐवजांची प्रत उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांना कळविले म्हणून त्यांनी प्रथम अपील सह संचालक नगर रचना नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्री एस. बी. झाडे हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. संचालक सौ. सुनिता अलोणी उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री झाडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०९/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.११/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने वर नमुद केल्याप्रमाणे मागितलेली माहिती ही सन १९९७ या वर्षातील आहे म्हणून त्यांनी अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांच्या विभागाच्या अभिलेखा मध्ये संबंधित कागदपत्रांचा शोध घेण्यात आला. परंतू त्यांच्या अभिलेखात सदरची कागदपत्रे उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२२/०३/२०११ च्या पत्रान्वये कळविले.

त्यानंतर अपीलार्थीने सहाय्यक संचालक, नगर रचना यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. ३०/०४/२०११ रोजी घेण्यात येवून त्यावर निर्णय देण्यात आला. त्यामध्ये असे नमूद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२२/०३/२०११ च्या पत्रान्वये सन १९९७ च्या अभिलेखातील धारिका शोध घेऊनही उपलब्ध होत नाही असे कळविले. अपीलार्थीने मागितलेला दस्तऐवज हा त्यांच्याकडील कार्यालयीन मॅनीयुल नुसार त्याचा जतन करण्याचा कालावधी ३ वर्षाचा आहे. त्यामुळे १९९७ चा रेकॉर्ड सद्यस्थितीत उपलब्ध नसल्याने अपीलार्थीस अपेक्षित दस्तऐवज पुरविता येत नाही मात्र अपीलार्थीने नव्याने नायब तहसिलदार नझुल यांचेकडे प्रस्ताव सादर केल्यास आणि नायब तहसिलदार नझुल नागपूर यांनी नागपूर सुधार प्रन्यासचा अभिप्राय मागितल्यास त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल आणि त्याची प्रत अपीलार्थीस पुरविता येईल असा प्रथम अपीलाचा निर्णय देऊन प्रथम अपील निकाली काढल्याचे सौ सुनिता अलोणी यांनी सांगितले.

४.  अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतले असता असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.०९/०३/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांना दि.२२/०३/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील दि.०९/०५/२०११ रोजी प्रथम अपीलाचा सविस्तरपणे निर्णय दिलेला असून त्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांनी कार्यवाही करणे योग्य होईल म्हणून प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला प्रथम अपीलाचा निर्णय कायम करण्यात येत आहे.

## आ दे श

१.  प्रथम अपीलाचा निर्णय कायम करण्यात येत आहे.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८५०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अरुण एकनाथ बोरकर<br>मु. पो. उश्राळमेंढा (व्हाया तळोधी (बा))<br>ता. नागभिड जि. चंद्रपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती नागभिड<br>ता. नागभिड जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा<br>पंचायत समिती नागभिड<br>ता. नागभिड जि. चंद्रपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.२६/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अवये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२९/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती नागभिड यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन उश्राळमेंढा ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये चुकीची कार्यवाही करुन ठराव केल्याने ही ग्रामसभा रद्द करुन संरपंचावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत दि.२२/१२/२०१० रोजी तक्रार अर्ज केला होता. त्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून

दि.२८/०१/२०११ च्या पत्रातील माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीचे त्यांना पत्र मिळाले नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरिता जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सौ लता शेडमाके हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी नागभिड यांच्या तर्फे विस्तार अधिकारी (पंचायत) श्री रत्नपारखी हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी सौ लता शेडमाके यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२९/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही विस्तार अधिकारी (पंचायत) नागभिड, पंचायत समिती यांचेशी संबंधित असल्याने त्यांना दि.३०/१२/२०१० रोजी पत्र लिहून त्यांच्याकडून माहिती मागविली. विस्तार अधिकारी पंचायत समिती यांचेकडून त्यांना दि.२८/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती प्राप्त झाली आणि त्याचदिवशी म्हणजे दि.२८/०१/२०११ च्या पत्रान्वये सदरची माहिती अपीलार्थीस पोस्टाद्वारे पाठविण्यात आली. आणि सदरच्या माहितीमध्ये असे नमुद करण्यात आले की, अपीलकर्ता श्री अरुण ए बोरकर रा. उश्राळ मेंढा यांनी माहिती अधिकाराखाली मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नाही म्हणून माहिती निरंक आहे अशी माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली आणि सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांच्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून माहिती निरंक आहे अशी माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली. मात्र त्यांच्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे अपीलार्थीने आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याच्या दि.२२/१२/२०१० च्या तक्रार अर्जाला अनुसरुन संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती नागभिड यांनी उश्राळ मेंढा ग्रामपंचायत येथील सचिव आणि सरपंचाचा खुलासा मागविला आहे त्याला अनुसरुन सचिवाने खुलासा पाठविला आहे. मात्र अदयाप पर्यंत सरपंचांनी खुलासा पाठविला नाही म्हणून सदरच्या अर्जावर कार्यवाहीझाली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले विस्तार अधिकारी, (पंचायत) श्री रत्नपारखी यांनी आयोगापुढे

सांगितले. तसेच त्यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, प्रस्तुत तक्रारीच्या संदर्भात संबंधित सरपंचाचा खुलासा लवकर प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही पंचायत समितीकडून करण्यात आली आहे.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीच्या दि.२२/१२/२०१० च्या तक्रार अर्जावर कार्यवाही झालेली नाही अशी माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतू अपीलकर्त्याच्या या तक्रार अर्जावर ग्रामपंचायतच्या सचिवांचा खुलासा प्राप्त झालेला आहे मात्र सरपंचाचा खुलासा प्राप्त झालेला नाही म्हणून संवर्ग विकास अधिकारी यांनी सरपंचाकडून त्यांचा खुलासा मागवून या तक्रारीच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकर्त्याच्या दि.२२/१२/२०१० च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी भविष्यात याची पूनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८४८/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रमेश गोविंद थोरात<br>१६, गुलमोहर, डॉ. साळवे नर्सिंग होम समोर, मानकापूर, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक<br>प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक<br>प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.२३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०८/०७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन संचालक आरोग्य सेवा मुंबई यांच्या सायक्रेटिक एक्झामिनेशन फॉर ओव्हरसियर्स संदर्भ क्र. RRC/1174/689/A of 1974 प्रमाणे वरील परिक्षा प्रथम श्रेणीत पास केल्याबद्दल स्पेशल

पे रु.२५/- व इतर भत्ते याप्रमाणे सुरु केले असतांना काही काळानंतर आपोआप बंद झाले ते कोणाचे व कोणत्या व का बंद झाले त्याबाबतच्या आदेशाची प्रत त्यांनी मागितली होती तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर डॉ. प्रवीण नवखरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक डॉ. अभय गजभिये हे उपस्थित होते.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०८/०७/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलार्थीस दि.२२/०७/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्या माहितीमध्ये अपीलार्थीस असे कळविले की, आपण आपल्या माहितीच्या संदर्भात वैद्यकीय अधिक्षकांच्या दालनात चर्चा केली आहे. त्याचप्रमाणे आपण मागितलेल्या माहितीबाबत सेवा पुस्तक, आवश्यक दस्तऐवज पडताळणी आपण स्वत: केली असून त्याबाबत आक्षेप नसल्याचे आपण सुचविले आहे अशी माहिती अपीलार्थीस दि.२२/०७/२०१० च्या पत्रान्वये कळविलेली आहे. त्यानंतर अपीलार्थीने दि.२३/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. आणि प्रथम अपीलानंतर देखील दि.२१/१०/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस आणखी स्पष्टपणे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली. त्या माहितीमध्ये असे कळविले की, आपणास १९७४ पासून मिळत असलेला Special Pay रु. २५/- हा बंद झालेला नसून १९७६ च्या वेतन निश्चितीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे अशी माहिती अपीलार्थीस पुन्हा उपलब्ध करुन दिल्याचे प्रथम अपीलय अधिकारी श्री गजभिये यांनी सांगितले. तसेच त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलार्थीचा Special Pay रु.२५/- हा १९७६ च्या वेतन निश्चिती मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे आणि त्याबाबतची नोंद मूळ सेवा पुस्तकामध्ये घेण्यात आली आहे. आणि त्या मुळ सेवा पुस्तिकेची झेरॉक्स प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची नोंद सेवा पुस्तिकेत करण्यात आल्याची कागदपत्रे जनमाहिती अधिकारी यांनी

आयोगासमोर दाखविली. आणि सदरच्या नोंदीची खात्री आयोगाने अपीलकर्त्यासमोर करुन दिली आणि सदरची नोंद सेवा पुस्तकात केल्याची खात्री अपीलार्थीने देखील करुन घेतली म्हणून अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८५६/नाग/२०११, ८५७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शामदेव काशिरामजी तितरमारे<br>२७०, चंदननगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर-९ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त (मुख्यालय)<br>पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)<br>पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १९/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.२६/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये अपील क्र.८५६/२०११ आणि ८५७/२०११ ही दोन द्वितीय अपील दाखल केली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांमध्ये माहितीचा विषय एकच असल्यामुळे आणि जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे सदर दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी एकत्रीत घेण्यासठी अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १९/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०५/०३/२०११ रोजी अपीलार्थीस महासंचालक महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय मुंबई यांचेकडे दि.०१/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्तालय नागपूर यांचेकडे दोन स्वतंत्र माहितीचे अर्ज दाखल करुन त्यांच्या दि.२४/०२/२०११ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाही संबंधित १ ते ३ मुद्यांची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपायुक्त (मुख्यालय) पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांची दोनही प्रथम अपीले फेटाळण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त श्री कुदरे हे हजर होते तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुकत श्री गुर्जर हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी श्री गुर्जर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०५/०३/२०११ चा माहितीचा अर्ज पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दि.१६/०३/२०११ रोजी प्राप्त झाला. त्याला अनुसरुन पोलीस आयुक्त कार्यालय यांचेकडून दि.१८/०४/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. अपीलार्थीने दि.२६/०४/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरले. म्हणून दि.१८/०४/२०११ च्या पत्रान्वये तयार केलेली माहिती दि.२६/०४/२०११ रोजी देण्यात आली. आणि त्याची पोच त्यांनी आयोगापुढे दाखविली. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याचा दि.०१/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. या अर्जामध्ये देखील अपीलार्थीने दि.०५/०३/२०११ च्या माहिती अर्जाप्रमाणेच माहिती मागितलेली आढळून आली. म्हणून अपीलार्थीस दि.२८/०३/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत पुन्हा पत्र देण्यात आले. त्यानुसार अपीलकर्ता यांनी दि.०२/०४/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरले आणि अपीलकर्त्यास पुन्हा आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली.

त्यानंतर अपीलार्थीने पोलीस उपायुक्त मुख्यालय नागपूर यांचेकडे दोन प्रथम अपीले दाखल केली. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली त्यामुळे सदरची दोनही प्रथम अपीले निकाली काढण्यात आल्याचे श्री गुर्जर यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांचेकडून पाठविलेली माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र अपीलकर्त्याच्या दि.२४/०२/२०११ च्या तक्रार अर्जावर केलेली चौकशी योग्य नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. मात्र अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जावर केलेल्या चौकशी अहवालाच्या गुणवत्ते संदर्भातील बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. त्यासाठी अपीलार्थीने सक्षम अधिकाऱ्याकडे दाद मागणे योग्य होईल व तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२४/०२/२०११ च्या तक्रार अर्जावर केलेल्या चौकशी अहवालाच्या प्रती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे वर नमुद केलेली दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ८५६/२०११ आणि ८५७/२०११ ही दोनही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९१०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री गौरीशंकर शामराव वासनिक<br>रा. वार्ड क्र.३, देवरी<br>ता. देवरी जि. गोंदिया. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी<br>ता. देवरी जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी<br>ता. देवरी जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.०८/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी श्री कांबळे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी हे वैद्यकीय रजेवर असल्यामुळे ते गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१२/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी जि. गोंदिया यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर

करुन बोरगाव आश्रम शाळेमध्ये मे २०१० च्या कालावधीत प्रशिक्षणार्थींना भोजन पुरवठा करण्याचे काम कोणाला दिलेले आहे याबाबतची माहिती मागितली होती. तसेच त्यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, सदरच्या प्रशिक्षणार्थींना भोजन देण्या संदर्भात टेंडर मागविण्यात आले होते, मात्र मागविण्यात आलेल्या टेंडर पैकी कोणालाही काम न देता ज्यांना टेंडर दिले नव्हते त्यांना हे काम देण्यात आले होते. म्हणून त्यांनी माहिती मागितली होती. जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना माहिती प्राप्त झाली परंतू त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रकल्प अधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी श्री कांबळे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१२/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१५/११/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही प्रशिक्षण केंद्राशी आणि भांडारपाल यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांना दि.१८/११/२०१० रोजी पत्र लिहून त्यांच्याकडून माहिती मागविली. त्याला अनुसरुन प्रशिक्षण केंद्राकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याबाबत दि.१३/१२/२०१० रोजी पत्र दिले. आणि अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरल्यानंतर अपीलार्थीस दि.१५/१२/२०१० रोजी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली आणि सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र प्रशिक्षणार्थींना भोजन देण्याचे काम शहीद बिरसामुंडा आदिवासी सुशिक्षित बेरोजगार संस्था यांना देण्यात आले. मात्र या संस्थेने भोजन देण्याबाबत टेंडर भरले नव्हते असे त्यांनी सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये असे कळविले आहे की, सदर प्रशिक्षण केंद्राचे सन २०१०-११ चे नियोजन प्राप्त झाल्यामुळे व सदर प्रशिक्षण केंद्र दि.०५/०७/२०१० पासून सुरु होत असल्यामुळे शहीद बिरसा मुंडा आदिवासी सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेला सन २००९ - २०१० च्या भोजन पुरवठयाच्या दराप्रमाणे भोजन देण्याचे काम दिले असल्याबाबत अपीलार्थीस कळविले आहे. आणि सदरचे आदेश हे प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी यांनी दि.१३/०७/२०१० च्या पत्रान्वये दिले आहे. आणि सदर पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दि.१२/११/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन माहितीचे शुल्क भरल्यानंतर दि.१५/१२/२०१० रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू ज्या संस्थेचे टेंडर फॉर्म नव्हते त्यांना भोजन पुरवठा करण्याबाबत आदेश दिल्याचे अपीलार्थीचे म्हणणे आहे. म्हणून

अपीलार्थीने याबाबत योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागणे संयुक्तिक होईल तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८६१/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अंकुश महादेवराव वाघमारे<br>पांडे कॉलेज समोर, येणारा रोड चौक, इंदिरा गांधी वार्ड, हिंगणघाट<br>ता. हिंगणघाट जि. वर्धा. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद कार्यालय, वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>स्व. इंदिरा गांधी विद्यालय, हिंगणघाट<br>पूरपीडीत कॉलनी, इंदिरा गांधी वार्ड, हिंगणघाट जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.२५/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०३/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक स्व. इंदिरा गांधी विद्यालय हिंगणघाट जि वर्धा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन खाजगी शाळा सेवा, शर्ती बाबत २५ टक्के कोटयातील पद कमी करुन विशेष कला शिक्षकांच्या भरती प्रक्रियेबाबत वापरलेल्या अधिकारा संदर्भातील शासन निर्णयाच्या बाबत १ ते १२ मुद्यांची माहिती मागितली होती.

परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापकाकडून दि.११/०३/२०११ च्या पत्रान्वये त्यांच्या माहिती अर्जाच्या मुद्यांचे स्पष्टीकरण करणे बाबत कळविले. मात्र त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. ०५/०४/२०११ रोजी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१०/०६/२०११ रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली आणि दि.२१/०६/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना अपीलार्थीस त्यांचे स्तरावरील माहिती उपलब्ध करुन देणे बाबत कळविले. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून यापूर्वी माहिती मिळालेली आहे. परंतू ती माहिती त्यांनी मागितलेल्या माहितीपेक्षा वेगळी आहे म्हणून त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केल्याचे नमुद केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री मधुकर खोडे हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. वर्धा श्री सोनवणे हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री मधुकर खोडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या १ ते १२ मुद्यांच्या संदर्भात स्पष्टीकरण करावे असे पत्र दि.११/०३/२०११ रोजी अपीलार्थीस पाठविले. तथापी त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. परंतू जनमाहिती अधिकारी यांना महत्त्वाचे काम असल्यामुळे प्रथम अपीलाच्या सुनावणीस ते उपस्थित राहू शकले नाही म्हणून त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे मिळाली नाही. तथापी अपीलार्थीस त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपेक्षित माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता यांच्या दि.०३/०३/२०११ च्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता अपीलार्थीने १ ते १२ मुद्यांची माहिती मागितलेली दिसते मात्र सदरच्या मुद्यांमध्ये काही मुद्ये हे प्रश्नार्थक स्वरुपाचे असल्याचे दिसून येतात. परंतू अपीलकर्त्यास यापूर्वी जी माहिती दिलेली आहे. ती माहिती या माहितीच्या

अर्जाशी संबंधित नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली माहिती ही त्या मुद्यांनाच अनुसरुन आहे असे मुख्याध्यापकांचे म्हणणे आहे म्हणून प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद वर्धा यांनी अपीलार्थीचा दि.०३/०३/२०११ चा माहितीचा अर्ज आणि जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली माहिती ह्याची प्रत्यक्ष शहानिशा करणे संयुक्तिक होईल. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी हजर राहून त्यांच्या समक्ष माहिती पुरविल्याची खात्री करुन घेणे योग्य राहील त्यासाठी अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या संमतीने आयोगासमोर असे ठरविण्यात आले की, अपीलकर्ता आणि जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी दि.३०/०९/२०११ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद वर्धा यांच्या कार्यालयात हजर राहून उपलब्ध करुन दिलेल्या माहितीची खात्री करुन घ्यावी आणि अपीलकर्त्याच्या दि.०३/०३/२०११ च्या माहिती अर्जातील १ ते १२ मुद्यांपैकी ज्या मुद्यांची माहिती माहितीच्या स्वरुपात देणे अपेक्षित आहे त्याची खात्री करावी आणि त्याप्रमाणे काही माहिती देणे बाकी असल्यास त्याची माहिती मुख्याध्यापकांनी अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी दि.३०/०९/२०११ रोजी शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद वर्धा यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहून मुख्याध्यापकांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीची खात्री शिक्षणाधिकारी यांनी करावी आणि खात्री अंती अपीलकर्त्यास आणखी काही माहिती माहितीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास ती जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी उपलब्ध करुन द्यावी.

सदरची कार्यवाही शिक्षणाधिकारी (मा) जि. प. वर्धा यांनी करावयाची आहे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९१३/नाग/२०११**

१. श्री मोहन वासुदेव केळकर - **अपीलकर्ता**
९०, उषःकाल बिल्डींग, गांधीनगर, नागपूर
ता. जि. नागपूर-४४००१०.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव - **उत्तरवादी**
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
मंत्रालय मुंबई-३२.

३. जामाहिती अधिकारी तथा अवरसचिव - **उत्तरवादी**
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
मंत्रालय मुंबई-३२.

**(आदेश पारित दिनांक २०/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.०६/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१५/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय मंत्रालय मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन खालील दोन मुद्यांची माहिती मागितली होती.

१)	महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे वर्ग २ च्या पदावर (दुग्धशाळा व्यवस्थापक -२) घेतलेल्या अधिकाऱ्यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे व अनुभवप्रमाणपत्रे आणि जात प्रमाणपत्रे हवी आहेत.

२)	तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाव्दारे वर्ग १ च्या पदावर (महाव्यवस्थापक) घेतलेल्या अधिकाऱ्यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे व जात प्रमाणपत्रे इ. संदर्भात २००५ पासून आज पर्यंतची दोन मुद्यांवर माहिती मागितली होती.

परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी दि.१६/०३/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, आपल्या माहिती अर्जानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे वर्ग-१ वर्ग-२ च्या पदावर घेतलेल्या अधिकाऱ्यांची वैयक्तिक स्वरुपातील शैक्षणिक प्रमाणपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे व जात प्रमाणपत्रे ती देखील मुळ स्वरुपात आपणास हवी असल्याचे आपल्या अर्जातील विषयावरुन स्पष्ट होत आहे म्हणून कोणत्याही व्यक्तीची शैक्षणिक प्रमाणपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे व जात प्रमाणपत्रे ही त्या त्या व्यक्तीची खाजगी बाब असून तीचा सार्वजनिक कामकाजाशी काहीही संबंध येत नाही अतयेव आपल्या अर्जातील मागणी संबंधित अधिकाऱ्यांच्या खाजगी बाबतीत आगंतुक हस्तक्षेप करणारी असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (त्र) नुसार माहिती आपणास देता येणे शक्य नाही असे कळविले.

त्यानंतर अपीलार्थीने जनमाहिती अधिकारी यांना दि.१३/०४/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, त्यांनी मुळ प्रमाणपत्राच्या प्रतीची मागणी केलेली नाही त्या प्रमाणपत्रांच्या छांयाकित प्रती त्यांना देण्यात याव्या परंतू त्यांना सदर छायांकित प्रती उपलब्ध झाल्या नाहीत म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना उपलब्ध झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय व मत्स्य विभाग मंत्रालय मुंबई श्री सोवितकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१५/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२३/०२/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने वरीलप्रमाणे दोन मुद्यांची माहिती मागितली होती. परंतू सदर माहितीच्या अर्जात मागणी केलेली शैक्षणिक प्रमाणपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे व जात प्रमाणपत्रे ही मुळ स्वरुपात हवी असावीत असा अर्जदाराचा उद्देश असल्याचे त्यांच्या

अर्जावरुन सकृतदर्शनी दिसून आले. त्यानुसार अपीलकर्ता यांना त्यांनी दि.१६/०३/२०११ च्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (त्र) चा आधार घेऊन सदर मुळ प्रमाणपत्रे ही त्या त्या अधिकाऱ्यांची वैयक्तिक व खाजगी माहिती असल्याने ती माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलार्थीस कळविले.

त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि.१३/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली होती. परंतू प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले मात्र त्यांनी दि.१३/०४/२०११ च्या पत्रान्वये कळविले की, मागणी केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांना द्याव्यात. त्यानंतर अपीलार्थीने मागितलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११ (१) च्या तरतुदी विचारात घेऊन महाराष्ट्र लोकसेव आयोगाद्वारे वर्ग -१ वर्ग -२ या पदावर निवड झालेल्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी सहसचिव (दुग्ध) तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे निवेदन सादर करुन त्यांच्या वैयक्तिक प्रमाणपत्राच्या प्रती अपीलार्थीस किंवा अन्य व्यक्तीस देण्यात येवू नये असे कळविले म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध न करुन देण्याचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेतल्याचे श्री सोवितकर यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीच्या दि.१५/०२/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे वर्ग-१ वर्ग-२ या पदावर निवड झालेल्या अधिकाऱ्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे व जात प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती त्यांनी मागितलेल्या आहेत. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही अधिकाऱ्यांच्या निवड प्रक्रियेशी संबंधित आहे म्हणून सदर अधिकाऱ्यांची निवड पारदर्शक पध्दतीने झालेली आहे हे दिसण्यासाठी सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यामध्ये व्यापक जनहित दिसून येते म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी अपीलकर्त्याच्या दि.१५/०२/२०११ च्या माहिती अर्जातील मुद्या क्र.१ व २ च्या सर्व माहितीच्या छांयाकित प्रती विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने अपीलार्थीस उपलब्ध करुन द्याव्या.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.८६३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री हरीश सुधाकर रेहेकरवार<br>किल्ला वार्ड, जुनी बस्ती, तिरोडा<br>पो. ता. तिरोडा जि. गोंदिया-४४१ ९११. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया<br>ता. जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता<br>पाटबंधारे विभाग, तिरोडा<br>ता. जि. गोंदिया. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २०/०९/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.२७/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१९/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, पाटबंधारे विभाग ता. तिरोडा जि. गोंदिया यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन नहराचे पाणी वाटपाबाबत १ ते ५ मुद्यावर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती

अधिकारी यांचेकडून मुद्या क्र. ३, ४, ५ ची माहिती उपलब्ध झाली. मात्र मुद्या क्र.१ व २ ची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही असे त्यांनी सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता श्री ढोरे हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे मुद्या क्र. १ च्या संदर्भात त्यांच्या दि. ०१/१०/२००८ च्या आणि दि.२५/१०/२०१० च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती देखील दिलेली आहे. तसेच मुद्या क्र.२ च्या संदर्भात नहार पाणी वाटपा बाबतच्या नियमावलीची प्रत त्यांनी सोबत आणलेली असून त्यांनी अपीलार्थीस आयोगापुढे उपलब्ध करुन दिली. तसेच मुद्या क्र. १ च्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती देखील अपीलार्थीस देण्यात आली म्हणून अपीलकर्त्याचे मुद्या क्र. १ व २ बाबत समाधान झाले. अपीलार्थीने सदरच्या नियमावलीची प्रत आयोगासमोर स्विकृत केली व संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले म्हणून अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९१९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नंदु सुकवा मस्ते<br>बंदी क्र.सी/७५२२, मंडल क्र.०३,<br>नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>महर्षी सुदर्शन वाल्मीकी कर्मचारी संस्था मर्या. नागपूर<br>बुधवार बाजार कॉम्लेक्स, राजविलास टॉकीज समोर,<br>महाल, नागपूर-४४० ००२. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी<br>महर्षी सुदर्शन वाल्मीकी कर्मचारी संस्था मर्या. नागपूर<br>बुधवार बाजार कॉम्लेक्स, राजविलास टॉकीज समोर,<br>महाल, नागपूर-४४० ००२. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २१/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.१०/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. आज आयोगापुढे सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा सहा. व्यवस्थापीका श्रीमती क्रिष्णा गुप्ता यांनी आयोगापुढे लेखी निवेदन सादर करुन असे नमुद केले की, सदरची संस्था ही कर्मचारी सहकारी पत संस्था असुन नागपूर महानगर पालिकेच्या सफाई कामगारांनी एकत्र येवून ही पतसंस्था नोंदणीकृत केली आहे. तसेच या सहकारी पतसंस्थेला शासनाकडून प्रत्यक्ष

किंवा अप्रत्यक्ष कोणतेही वित्तीय सहाय्य मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी या सहकारी पतसंस्थेला लागू होत नाही असे त्यांनी लेखी निवेदनात नमुद केले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलार्थीने यापूर्वी आयोगाकडे या संस्थेविषयी अपील क्रमांक ५०७/२००८ हे दाखल केले होते. आणि या अपीलाचा निर्णय दि.०६/०३/२००९ रोजी दिला होता. आयोगाच्या या निर्णयाची प्रत सहा. व्यवस्थापीका यांनी आयोगापुढे दाखल केली. तसेच आयोगाकडील अपील क्र. ५०७/२००८ च्या दि.०६/०३/२००९ च्या निर्णयात असेही नमुद केले की, श्री गजानन वानखेडे विरुध्द डॉ पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लि. अमरावती, अपील क्र. ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र.५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी सहकारी बँकांना व सहकारी पतसंस्थेला लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. म्हणून अपीलकर्ता यांनी नागपूर मेहतर विविध बहुउद्येशिय सहकारी पतसंस्था पूर्ववत महर्षी वाल्मीकी सहकारी पत संस्था यांचेकडे माहिती मागितली असल्यामुळे मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा या सहकारी पतसंस्थेस लागू होत नाही. तथापी सदरची संस्था ही सहकारी कायद्यान्वये नोंदणीकृत झालेली असल्यामुळे सहकारी कायद्यातील तरतुदी नुसार अपीलकर्त्यास माहिती प्राप्त होण्यासाठी अपीलकर्ता यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे संपर्क साधणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९१५/नाग/२०११, अपील क्र.९१६/नाग/२०११, अपील क्र.९१७/नाग/२०११,</u>**

१. श्री कमलकिशोर तुलसीदास मालपानी - **अपीलकर्ता**
५२, राठी मार्ग, पुलगांव
ता. देवळी जि. वर्धा.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी - **उत्तरवादी**
नगर परिषद कार्यालय पुलगांव
ता. देवळी जि. वर्धा.

३. जामाहिती अधिकारी तथा बांधकाम अभियंता (बांधकाम विभाग) - **उत्तरवादी**
नगर परिषद कार्यालय पुलगांव
ता. देवळी जि. वर्धा.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सिरस्तेदार
उपविभागीय अधिकारी कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा.

**(आदेश पारित दिनांक २१/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.०७/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये अपील क्र. ९१५/२०११, ९१६/२०११, ९१७/२०११ अशी तीन द्वितीय अपील दाखल केली आहेत. सदर तीनही द्वितीय अपीलांमधील माहिती एकच असल्यामुळे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.२१/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा बांधकाम अभियंता नगर पालिका पुलगांव यांचेकडे दि.०८/०२/२०११ रोजी, तसेच जनमाहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांचेकडे दि.०४/१०/२०१० रोजी आणि जनमहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय वर्धा यांचेकडे दि.०५/०४/२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जिल्हाधिकारी वर्धा यांचे कार्यालयात दि.०७/०२/२००५ रोजी लोकशाही दिनामध्ये दाखल केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात टोकण नंबर ५९ हा त्यावर दाखल होता. त्या तक्रारीवर उपविभागीय अधिकारी वर्धा यांनी केलेल्या चौकशी किंवा आदेशाची प्रत अपीलार्थीने मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी नगर परिषद पुलगाव यांनी तसेच जनमाहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा आणि जनमाहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी वर्धा यांनी असे कळविले की, आपण माहितीच्या अर्जात मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यांची दोनही प्रथम अपीले खारीज करण्यात आली मात्र जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक यांनी अपीलकर्त्याचे प्रथम अपील मंजूर करुन उपविभागीय अधिकारी वर्धा यांनी अपीलकर्त्यास लोकशाही दिन टोकण क्र.५९ दि.०७/०२/२००५ मध्ये त्यांचे पत्र क्र.५६४/२००४ दि.१७/०२/२००५ अन्वये अहवालाची प्रत १० दिवसांचे आत उपलब्ध करुन देण्यात यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिला. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा सिरस्तेदार, उपविभागीय कार्यालय वर्धा श्री अतुल राजपायले यांनी आयोगापुढे सांगितले की, प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक, जिल्हाधिकारी वर्धा यांनी दि.२९/०४/२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित केला त्याला अनुसरुन अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या नस्तीचा कसून शोध घेण्यात आला. सदरची नस्ती त्यांना उपलब्ध झाली ती नस्ती त्यांनी अपीलकर्त्यास निरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिली. अपीलकर्त्याने सदरच्या नस्तीचे निरिक्षण केल्याचे आयोगापुढे मान्य केले. मात्र उपविभागीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात केलेल्या अंतिम आदेशाची प्रत त्यांना उपलब्ध झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी श्री अतुल राजपायले यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, सदरच्या धारिकेमध्ये आदेशपत्र (ordersheet) उपलब्ध आहे मात्र त्या अनुषंगाने अंतिम आदेशाची प्रत त्या धारिकेत उपलब्ध नाही म्हणून प्रस्तुत धारिकेतील आदेशाची प्रत (ordersheet) अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. आणि प्रस्तुत प्रकरणात सदरच्या धारिकेत फक्त आदेशाची प्रत उपलब्ध असून अंतिम आदेशाची प्रत त्यामध्ये उपलब्ध नाही असे

स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे न्यायोचित होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र.९१७/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून सात दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा शिरस्तेदार श्री अतुल राजपायले उपविभागीय अधिकारी कार्यालय वर्धा यांनी अपीलार्थीस सदरच्या धारिकेतील आदेशपत्राची (ordersheet) प्रत अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. आणि त्या संबंधात प्रस्तुत धारिकेमध्ये आदेशाची प्रत (ordersheet) उपलब्ध आहे परंतू अंतिम आदेशाची प्रत उपलब्ध नाही असे देखील स्पष्टपणे कळवावे.

२. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ९१५/२०११ आणि ९१६/२०११ ही दोनही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९१८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री टी. ए. सेट्टी वल्द नारायण सेट्टी<br>प्लॉट नं. २०६, क्रिष्णा प्लाजा अपार्टमेंट, टिंबर भवन मागे, लकडगंज, नागपूर<br>ता. जि. नागपूर-८. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (उत्तर)<br>नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी (उत्तर)<br>नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २१/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.०८/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२४/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी (उत्तर) नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन नागपूर सुधार प्रन्यासकडील नोटीस AE/ENF/NE/ दि.२६/०६/२००६ श्री म. ग. लाडे यांना दिलेल्या नोटीसवर काय कार्यवाही केली तसेच Development Charge जमा केला काय बांधकाम नकाशा मंजुर केला काय याबाबतची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी

यांचेकडून दि. ०१/०३/२०११ च्या पत्रान्वये तसेच दि.०४/०३/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध झाली परंतू त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर त्यांना पुन्हा माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीने देखील त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी (उत्तर) नागपूर सुधार प्रन्यास नागपूर श्री मुकुल बोस हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री पासेबंद हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२४/०२/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलार्थीस माहिती अधिकारी तथा इमारत अभियंता नागपूर सुधार प्रन्यास यांनी दि.०४/०३/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, खसरा क्र.२०१/२ मौजा नारासाई कृपा गृह निर्माण सहकारी संस्था नवीन भुखंड क्र.३४ चे रजिस्टर्ड दस्तऐवज नसल्यामुळे नियमीतीकरण करण्यात आले नसून इमारत बांधकाम नकाशा मंजूर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही अशी माहिती इमारत अभियंता यांचेशी संबंधित असल्याने त्यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. त्याचप्रमाणे दि.०१/०३/२०११ च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविले की, अनधिकृत बांधकाम नोटीस क्र. AE/ENS/NA/२४ दि.२६/०६/२००६ या बाबत कार्यवाही केल्याचा अभिलेख या कार्यालयात उपलब्ध नाही असे अपीलार्थीस दोनही जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याशी संबंधित मुद्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली.

त्यानंतर अपीलकर्ता यांनी कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर पुन्हा विभागीय अधिकारी (उत्तर) तथा जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२७/०५/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, त्यांच्या कार्यालयाकडून अनधिकृत बांधकाम नोटीस दि.२६/०६/२००६ वर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. इमारत अभियंता आणि विभागीय अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी यांचेकडून वर नमुद केलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र अपीलार्थीचे याबाबत असे म्हणणे आहे की, सदरच्या बेकायदेशीर बांधकाम तोडण्याची कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यासने करावी म्हणून अवैध बांधकाम तोडण्या संदर्भात

अपीलार्थीने सक्षम अधिकाऱ्याकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलार्थीस वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक...................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९२५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री तुकडू बारीकराव मेश्राम<br>मालवीय नगर, तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा-४४१९१२. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी<br>नगर परिषद कार्यालय तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी<br>नगर परिषद कार्यालय तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २२/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.१०/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२२/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय तुमसर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन नगर पालिकेने पत्र क्र. ३०९० दि.२४/०८/१९९८ पत्र तयार केले आहे त्या पत्राची प्रत आणि श्री एम. टी. खाडीलकर तात्कालीन मुख्याधिकारी आणि पोलीस विभाग तुमसर यांनी ऑक्टोबर २००१ ते ऑगष्ट २००३ या कालावधीत चौकशी केलेली आहे या दोनही चौकशी अहवालाच्या प्रती त्यांनी मागितल्या होत्या.

परंतु त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.०६/०४/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती उपलब्ध झाली परंतू त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी मुख्याधिकारी नगर परिषद तुमसर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी, नगर परिषद तुमसर श्री के. एन. मानकर हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी किशोर धोटे हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२२/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कायर्झलयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मागितलेल्या माहिती संदर्भात माहितीचा शोध घेण्यात आला. तथापी त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि.०६/०४/२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास असे कळविले की, दि. ०९/०२/२०११ श्री पी. बी. मेश्राम, सेवानिवृत्त शिक्षक यांची फाईल नगर परिषदेने शाळेला हस्तांतरीत केली त्या फाईलमध्ये सदर पत्र उपलब्ध नाही तसेच श्री एम. टी. खाडीलकर तात्कालीन मुख्याधिकारी आणि पोलीस विभाग तुमसर यांनी ऑक्टोबर २००१ ते ऑगष्ट २००३ या कालावधीत केलेला चौकशी अहवाल त्यांच्याकडे उपलब्ध नाही अशी माहिती त्यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली सदर माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध झाल्याचे त्यांनी मान्य केले. परंतू सदर माहिती ही खोटी व दिशाभूल करणारी आहे असे अपीलार्थीने सांगितले. म्हणून त्यांनी मुख्याधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.

४. मुख्याधिकारी श्री धोटे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि दि.११/०४/२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. आणि त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्याच्या माहिती अर्जानुसार मागितलेल्या माहितीविषयी नगर परिषद कार्यालयातील उपलब्ध दस्तऐवजांचा शोध घेऊन माहिती प्राप्त झाल्यास अर्जदारास पुरवावी. तसेच या विषयी शिक्षणाधिकारी, भंडारा यांना पत्राद्वारे विचारणा करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा आणि तत्कालीन मुख्याधिकारी, श्री खाडीलकर यांनी पोलीस विभागा मार्फत केलेल्या चौकशी प्रकरणाबद्यल पोलीस विभागाकडे पत्र पाठवून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घ्यावी आणि माहिती प्राप्त झाल्यास माहिती अर्जाप्रमाणे अर्जदारास विनामुल्य

१५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमीत केल्याचे श्री धोटे यांनी सांगितले.

प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर पोलीस निरिक्षक, तुमसर आणि शिक्षणाधिकारी (मा) शिक्षण विभाग जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आला. परंतू पोलीस निरिक्षक तुमसर यांनी त्यांच्याकडील दि.१९/०४/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, प्रस्तुत प्रकरणात पोलीसांमार्फत कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही असे पोलीस स्टेशन तुमसर यांचेकडून कळविण्यात आले. त्याचप्रमाणे शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद भंडारा यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, नगर पालिकेचे पत्रक क्र..३०९० दि.२४/०८/१९९८ या पत्राची प्रत नगर पालीकेने मा. उच्च न्यायालयात दि.२९/११/२००० ला प्रतिज्ञा पत्र दाखल केले आहे. त्या प्रतिज्ञा पत्रामध्ये पत्र क्र.३०९० दि.२४/०९/१९९८ चा उल्लेख आहे म्हणून नगर पालिकेकडे सदरच्या प्रतिज्ञा पत्राची प्रत उपलब्ध असल्यास आणि त्या सोबत सदरची प्रत असल्यास ती प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून मुख्याधिकारी, नगर परिषद तुमसर यांनी नगर परिषदेच्या वतीने दि.२९/११/२००० रोजी दाखल केलेल्या प्रतिज्ञा पत्राचा शोध घ्यावा आणि सदरच्या प्रतिज्ञापत्रात पत्र क्र.३०९० दि.२४/०८/१९९८ चे पत्र उपलब्ध झाल्यास ते अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावे परंतू सदरचे पत्र उपलब्ध न झाल्यास तसे अपीलकर्त्यास कळवावे.

२.    अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९२६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुनिल जॅकब<br>यीशु हाऊस, ६४०/बी, एन.आर.सी.डी.सी. कॉलोनी<br>खलाशी लैन, मोतीबाग, नागपूर.<br>ता. जि. नागपूर-४४० ००१. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक<br>भूमि अभिलेख नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.२<br>प्रशासकीय इमारत क्र.१, सिव्हील लाईन, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २२/०९/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.१०/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०९/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी क्र.२ नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन नगर भुमापन क्र.२०१७ मौजा इंदोरा नझुल भु. क्र. ६५ नामे वसंत राघवेन्द्र बोरकर यांचा दि.२८/०९/२००७ मध्ये फेरफार झाला आहे त्या फेरफाराचे संदर्भातील कागदपत्रे अपीलार्थीने मागितली होती. परंतू त्यांना

जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी क्र.२ श्री बेंडे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी श्री सुर्यवंशी हजर होते.

जनमाहिती अधिकारी श्री बेंडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.०९/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील प्रकरणाचा शोध घेण्यात आला. तथापी ते प्रकरण उपलब्ध झाले नाही म्हणून अपीलकर्त्यास दि.०६/०१/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण मागितलेल्या मोजमाप झालेल्या प्रकरणाचा शोध घेणे सुरु आहे. प्रकरण प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल असे अपीलार्थीस कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा शोध घेऊन ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला असल्याचे श्री सुर्यवंशी यांनी आयोगापुढे सांगितले.

जनमाहिती अधिकारी श्री बेंडे यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांचे कार्यालयात फेरफार करण्याची कार्यवाही झालेली आहे. परंतू सदरच्या फेरफाराची कागदपत्रे शोध घेऊनही अदयाप पर्यंत त्यांना मिळाली नाही म्हणून त्या कागदपत्रांचा शोध अदयापही सुरु आहे.

वास्तवीक पाहता ज्या कागदपत्रां च्या आधरे फेरफार घेण्यात येतो त्या फेरफाराची संपूर्ण माहिती किंवा ज्या आधारे फेरफार घेण्यात आले आहे ती कागदपत्रे कार्यालयात असणे जरुरीचे आहे. म्हणून अपीलार्थीने मागितलेल्या कागदपत्रांचा जनमाहिती अधिकारी यांनी कसून शोध घ्यावा आणि कागदपत्रे उपलब्ध न झाल्यास या बाबीस जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर कार्यवाही करणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा कसून शोध घ्यावा आणि माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी तथापी सदरची माहिती उपलब्ध न झाल्यास याबाबत जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवा शर्ती प्रमाणे कार्यवाही प्रस्तावीत करावी आणि तसा अहवाल राज्य माहिती आयोगाकडे सादर करावा.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक...................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९२९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रामदास एम. मासुरकर<br>हिवरी म्हाडा वसाहत, हिवरी नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर-८. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी<br>नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नगपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक -२<br>नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नगपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २२/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.१०/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०२/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन नागपूर म्हाडा सुगत नगर योजनेतील भुखंड/गाळा क्र. ए २३७ रेकॉर्ड या क्रमांकाचे नस्ती रेकॉर्डनुसार नस्तींचा शोध घेतल्यानुसार आवश्यक असलेल्या नस्तींच्या माहितीची

कागदपत्रे माहितीच्या अधिकारात मुदतीचे आत मागितली होती. सदर क्रमांकाच्या नस्तीचा शोध घेण्यासाठी अर्जदारास आपले पत्र प्राप्त झाल्यानंतर अर्जदार स्वत: मंडळ कार्यालयात येवून सदरच्या नस्तींच्या माहिती पत्रकांचा रक्कम भरणा करुन माहिती त्वरीत घेईल अशी माहिती त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.२९/०४/२०११ च्या पत्रान्वये सदर भुखंड/गाळा कोणत्या योजनेतील आहे या संबंधाने स्पष्ट नमुद न केल्यामुळे माहिती पुरविणे शक्य नाही असे त्यांना कळविले. तथापी त्यांना संबंधीत रेकॉर्डची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील नामंजूर केले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक श्री गिरी हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०२/०४/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतू अपीलार्थीस पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात कोणताही स्पष्ट अर्थबोध होत नव्हता म्हणून अपीलकर्त्यास दि.२९/०४/२०११ च्या पत्रान्वये वर नमुद केल्याप्रमाणे कळविले. सदर पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यावर अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, अर्जात नमुद केलेला भुखंड / गाळा क्र.ए २३७ सुगत नगर हा कोणत्या योजनेतील आहे याबाबतची माहिती त्यांना नाही म्हणून त्यांना योजनेच्या संदर्भात माहिती देता आली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळामार्फत अनेक योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत म्हणून भुखंड क्र. ए २३७ हा निश्चित कोणत्या वसाहतीचा आहे हे समजत नसल्यामुळे त्याबाबतची नस्ती उपलब्ध करुन देता येत नाही. परंतू जनमाहिती अधिकारी यांचेकडे सुगत नगर परिसरातील उपलब्ध असलेल्या सर्व नस्त्या अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे शक्य आहे. म्हणून अपीलकर्ता हे जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर अपीलार्थीस सुगत नगर परिसरातील भुखंडाचे वाटप योजनांच्या सर्व नस्त्या निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्याव्या आणि त्यातील अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेतील असे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून सुगत नगर येथील गाळे वाटप झालेल्या नस्तींचे निरिक्षण करुन घ्यावे आणि निरिक्षणाअंती त्यांना पाहिजे असलेल्या नस्तींचे शुल्क भरुन त्यांनी माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९२८/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रामदास एम. मासुरकर<br>हिवरी म्हाडा वसाहत, हिवरी नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर-८. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी<br>नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नगपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक -२<br>नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नगपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २२/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.१०/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०२/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन नागपूर म्हाडा हिवरी २८८ अल्प उत्पन्नातील गाळा क्र.६/१ या गाळ्च्या जाहिराती संबंधि मंडळाद्वारे

अर्ज विकलेल्या अर्जाच्या नोंदीनुसार तसेच मंडळास प्राप्त झालेले अर्जाचे नोंदीनुसार संपूर्ण कागदपत्रांची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२९/०४/२०११ च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. परंतू त्यांना विलंबाने दि.३०/०४/२०११ रोजी सदर पत्र प्राप्त झाले म्हणून त्यांनी माहितीचे शुल्क भरले नाही त्यानंतर त्यांनी मुख्याधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र मुख्याधिकारी यांनी अपीलार्थीने शुल्काचा भरणा केला नाही म्हणून सदरचे प्रथम अपील फेटाळले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक श्री गिरी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि. ०२/०४/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दि.२९/०४/२०११ रोजी पत्र पाठवून माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेण्यास कळविले होते परंतू अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरणा केले नाही. म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दाखल केले. परंतू अपीलार्थीने माहितीच्या शुल्काचा भरणा केला नाही म्हणून त्यांचे प्रथम अपील फेटाळल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.०२/०४/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२९/०४/२०११ च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले होते. सदरची कार्यवाही जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसाचे आत केल्यामुळे अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेल्या दस्तऐवजांचे शुल्क भरुन आवश्यक ती माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९२७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुनिल जॅकब<br>यीशु हाऊस, ६४०/बी, एन.आर.सी.डी.सी. कॉलोनी<br>खलाशी लैन, मोतीबाग, नागपूर.<br>ता. जि. नागपूर-४४० ००१. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक<br>भूमि अभिलेख नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.३<br>प्रशासकीय इमारत क्र.१, सिव्हील लाईन, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २२/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.१०/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०९/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी क्र.२ नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन दोन खालील दोन मुद्यांवर माहिती मागितली होती.

१) प्लॉट क्र.९८ राठोड ले आऊट नगर भूमापन क्र.११४० मोजणी दि.३१/०३/१९९७ व अपील क्र. ३१/०५/२००२ रोजी निर्णय देण्यात आला त्या निर्णयावर केलेली कार्यवाही.

२) दि.२२/१०/२०१० रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणीची नोटीस त्यांना मिळाली नाही मात्र त्यांच्या गैरहजेरीत प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला म्हणून त्यांचे समाधान झाले नाही त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी श्री हट्टेकर हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख श्री सूर्यवंशी हजर होते.

जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी श्री हट्टेकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०९/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२२/१२/२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाने प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी दि.१७/०१/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस असे उत्तर पाठविले की, आपण माहितीच्या अर्जात नगर भुमापन क्रमांकाचा मौजा दिलेला नाही तसेच नोंदणी रजिस्टरचा क्रमांक दिलेला नसल्यामुळे माहिती पुरविता येत नाही म्हणून माहितीचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे कळविले.

सदरचे दि.१७/०१/२०११ चे पत्र अपीलार्थीस अदयाप पर्यंत प्राप्त झाले नाही असे अपीलार्थीने आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दि.१७/०१/२०११ चे पत्र पोस्टद्वारे अपीलार्थीस पाठविण्यात आली होते. मात्र याबाबतचा पुरावा आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी दाखविला असता सदरचे दि.१७/०१/२०११ चे पत्र दि.१७/०१/२०११ या दिनांकाच्या आधीच पाठविल्याचे जावक रजिस्टरवरुन दिसून येते. वास्तवीकपाहता दि.१७/०१/२०११ चे पत्र दि.१७/०१/२०११ रोजी किंवा त्यानंतर जावक होणे अपेक्षित आहे. मात्र याबाबत जावक रजिस्टरवरुन सदरचे पत्र दि.१७/०१/२०११ च्या पूर्वीच पाठविल्याची नोंद दिसून येते. म्हणून अपीलार्थीस दि.१७/०१/२०११ चे पत्र पाठविल्याचा पुरावा ग्राहय धरता येत नाही. तसेच अपीलार्थीने

माहितीच्या अर्जात दि.२२/१०/२०१० च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती ती माहिती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध झालेली दिसून येत नाही. म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला दिसून येतो. या विलंबास जनमाहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलार्थीने माहितीच्या अर्जात नमुद केलेले दि.२२/१०/२०१० चे पत्र त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले नाही. तसेच अपीलार्थीस दि.१७/०१/२०११ रोजी पाठविलेले पत्र नजर चुकीने दि.१७/०१/२०११ च्या पूर्वी जावक केलेले आहे असेही त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी याबाबत केलेला खुलासा मान्य करण्यासारखा नाही म्हणून अपीलार्थीस त्यांच्या दि.०९/१२/२०१० च्या माहिती अर्जातील वर नमुद केल्याप्रमाणे सदरच्या दोनही मुद्यांची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या दि.९/१२/२०१० च्या माहिती अर्जातील संपूर्ण माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलार्थीचा दि.०९/१२/२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दि.२२/१२/२०१० रोजी प्राप्त होवूनही वर नमुद केल्याप्रमाणे ३० दिवसांचे मुदतीत जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये जनमाहिती अधिकारी यांचेवर रु. ५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

३. सदरच्या शास्तीच्या रकमेची वसूली जनमाहिती अधिकारी यांच्या दरमहाच्या वेतनातून कपात करुन लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". खाली शासकीय खजिन्यात चालानद्वारे भरणा करावी.

४. सदरच्या शास्तीची वसूली जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख नागपूर यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या दरमहाच्या वेतनातून कपात करावयाची असून शास्तीची संपूर्ण रक्कम वसूल झाल्यानंतर चालानसह वसूलीचा अहवाल जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांनी आयोगाकडे सादर करावा.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९५५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री व्हि. के. कोकोडे<br>केंद्रीय अध्यक्ष (जी.ओ.ई.ए.जी.)<br>मध्यवर्ती काष्ट भांडार (पोटेगांव रोड)<br>गडचिरोली. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>सामाजिक वनिकरण विभाग, संकुल, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा उपसंचालक<br>सामाजिक वनिकरण विभाग, संकुल, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.१७/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता गैरहजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे आज आयोगापुढे सुनावणीकरीता गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग गडचिरोली यांचे तर्फे श्री प्रकाश दैय्यमवार हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने देखील त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले होते.

३. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने हजर असलेले श्री दय्यमवार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.११/०५/२०११ चा माहितीचा त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदर माहिती अर्जात अपीलार्थीने त्यांचे वार्षीक वेतन वाढ रोखणे बाबत प्राधिकृत अधिकाऱ्याच्या आदेशाची साक्षांकित प्रत मागितली होती. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि.२३/०५/२०११ च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले त्यानुसार अपीलकर्त्याने दि.२६/०५/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरले त्याचदिवशी अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्या आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली.

४. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस त्यांच्या दि.११/०५/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२३/०५/२०११ च्या पत्रान्वये दि.२६/०५/२०११ रोजी शुल्क भरल्यानंतर अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९५६/नाग/२०११, अपील क्र.९५७/नाग/२०११,</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता.जि. चंद्रपूर-४४२ ४०२. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन)<br>C/o, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कॅम्प अमरावती<br>ता. जि. अमरावती-४४४६०२. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>C/o, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कॅम्प अमरावती<br>ता. जि. अमरावती-४४४६०२. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.१७/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये अपील क्र.९५६/२०११ आणि अपील क्र.९५७/२०११ अशी दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. या दोनही अपीलांमध्ये अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३/०९/२०११ रोजी दोनही द्वितीय अपलांची एकत्रीत सुनावणी घेण्यासाठी नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता हजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२४/०२/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक विभाग अमरावती यांचेकडे दोन माहितीचे अर्ज सादर करुन एका माहितीच्या अर्जात वनसंरक्षक, पेड व्हेंडर पदावरुन लिपीक / लेखापाल पदावर पदोन्नती /

नियुक्ती या संदर्भात सन १९८० पासून १ ते ३ मुद्यांची माहिती मागितली होती. त्याचप्रमाणे दुसऱ्या माहितीच्या अर्जात वनसंरक्षक अमरावती वनवृत्त अमरावती यांचे आदेश क्रमांक ४६३ दि.१३/११/१९८१ अन्वये लेखापाल पदी नियुक्तीच्या संदर्भात १ ते ७ मुद्यांवर माहिती मागितली होती. आज सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक यांचे तर्फे लेखापाल श्री कडू हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी श्री घुले हे उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.२४/०२/२०११ चा माहितीचा अर्ज दि.२८/०२/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील मुख्य लेखापाल आस्थापना शाखा यांचेशी संबंधित असल्याने त्यांच्याकडून दि.०३/०३/२०११ च्या पत्रान्वये सदरची माहिती मागितली. मुख्यलेखापाल यांनी दि.०४/०३/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती फार पूर्वीची असल्याने अ.ब.क.ड. नुसार माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही आणि ही माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दि.०७/०२/२०११ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने अपीलार्थीस पाठविली असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले. परंतू अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांच्याकडे या पदांच्या बाबत जेष्ठता सूची आहे त्याची प्रत अपीलकर्त्यास आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीने आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले. त्याचप्रमाणे अपीलार्थीच्या दुसऱ्या माहितीच्या अर्जात अपीलार्थीने वनसंरक्षक अमरावती वनवृत्त अमरावती यांचे दि.१३/११/१९८१ च्या आदेशाप्रमाणे लेखापालपदी नियुक्ती केल्या संदर्भात १ ते ७ मुद्यांची माहिती मागितली होती. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. ०७/०३/२०११ चे पत्राने माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. ही माहिती अपूर्ण आहे असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांच्याकडे आणखी जी माहिती उपलब्ध होती. त्याची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले म्हणून अपीलकर्ता यांची दोनही द्वितीय अपीले खारीज करण्यात येत आहेत.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र.९५६/२०११ आणि अपील क्र. ९५७/२०११ ही दोनही द्वितीय अपीले खारीज करण्यात येत आहेत.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७७६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर-४४२ ४०२. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन)<br>C/o, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे<br>जुनी पी. एम. टी. बिल्डींग, स्वारगेट, पुणे ४११०३७. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>C/o, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे<br>जुनी पी. एम. टी. बिल्डींग, स्वारगेट, पुणे ४११०३७. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २३/०९/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.१३/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू त्यादिवशी जनमाहिती अधिकारी हे गैरहजर राहिल्यामुळे त्या अपीलाची सुनावणी आज दि.२३/०९/२०११ रोजी घेण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरीता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१८/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) विभाग पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन भारतीय वनसेवा व महाराष्ट्र वनसेवा या संवर्गात कार्यरत अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाच्या

कार्यवहीबाबत आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत १ ते २ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून मुद्या क्र. १ ची माहिती प्राप्त झाली. मात्र मुद्या क्र.२ ची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक श्री जी. शं. आगलावे हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी श्री एस. बी. फुले हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक श्री जी. शं. आगलावे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१८/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.३०/१०/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही आस्थापना शाखेशी संबंधित असल्याने त्यांच्याकडून मागविण्यात आली. सदरची माहिती संकलीत करण्यात आली आणि अपीलार्थीस दि.२०/११/२०१० च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. त्याप्रमाणे अपीलार्थीने माहितीचे शुल्क मनिऑर्डरने पाठविले आणि अपीलार्थीस दि.१४/०१/२०११ रोजी मुद्या क्र.१ ते २ व अ.ब.क. ची माहिती एकूण १० पाने पाठविली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना जाती वैधता प्रमाणपत्राबाबतची माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या कार्यालयात जाती वैधता प्रमाणपत्राबाबत कर्मचाऱ्यांची यादी आहे ती यादी त्यांनी अपीलार्थीस आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. सदर माहिती अपीलार्थीने आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले म्हणून अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९५९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर-४४२ ४०२. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक (सं)<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गिरीपेठ, नागपूर<br>ता. जि. नागपूर-४४००१०. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गिरीपेठ, नागपूर<br>ता. जि. नागपूर-४४००१०. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.१७/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून २६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१३/०५/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन श्रीमती वसूधा नाईक उपसंचालक यांच्या सेवा संबंधातील १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२४/०५/२०११ च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, श्रीमती वसूधा नाईक ह्या त्यांच्या कार्यालयाच्या आस्थापनेवर नाहीत. सबब

आपण अनुसुचित जमाती प्रमाणपत्र समिती गडचिरोली यांचेकडे या संदर्भात पुढील पत्रव्यवहार करावा अशी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली. त्या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी उपसंचालक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. दि. ०६/०६/२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देवून सदरचे प्रथम अपील खारीज करण्यात आले त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी श्री गेडाम हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक श्री विनोद पाटील हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी श्री गेडाम यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१३/०५/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१८/०५/२०११ रोजी प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन श्रीमती वसूधा नाईक ह्या या समितीच्या आस्थापनेवर नाहीत सबब आपण अनुसुचित जमाती प्रमाणपत्र समिती यांचेशी पत्रव्यवहार करावा अशी माहिती त्यांना कळविण्यात आली त्यानंतर त्यांनी प्रथम अपील उपसंचालक यांचेकडे दाखल केले. मात्र अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि.२४/०५/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे आणि अपीलार्थीने मागितलेल्या माहितीत कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी श्री विनोद पाटील यांनी सांगितले. त्यावर अपीलार्थीने आयोगापुढे सांगितले की, श्रीमती वसूधा नाईक यांच्या पदोन्नतीच्या आदेशाची प्रत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध आहे. सदरची प्रत त्यांना त्यांच्या कार्यालयाकडून देण्यात यावी. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, श्रीमती वसुधा नाईक ह्या पूर्वी त्यांच्या आस्थापनेवर होत्या त्यांच्या पदोन्नतीची प्रत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झाल्यास ती अपीलार्थीस पुरविण्याचे त्यांनी मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी श्रीमती वसूधा नाईक यांच्या पदोन्नतीची प्रत त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असल्यास ती प्रत विनामुल्य पोस्टाने पाठवावी. तथापी उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे अपीलार्थीस कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९३९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विशाल प. मोहोड (अधिवक्ता)<br>वसंत नगर, जुना बाबुलखेडा, गल्ली नं. १३, प्लॉट नं.१६, नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी<br>माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २८/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.१४/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून २६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.११/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन उदय विद्यालय अंतुजी नगर भांडेवाडी नागपूर या संस्थामध्ये झालेल्या गैरव्यवहारासंबंधि आणि सदर संस्थेत श्री प्रमोद बी वाढई कनिष्ठ लिपीक यांचे बद्यल प्राप्त झालेल्या तक्रारीचे संदर्भात केलेल्या कार्यवाही

बाबत १ ते ७ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक श्रीमती पंतगे ह्या उपस्थित होत्या त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.११/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्रीमती राठोड यांचेशी संबंधित होती म्हणून सदरची माहिती त्यांच्याकडून मागविण्यात आली. परंतू दरम्यानच्या काळात श्रीमती राठोड या वैद्यकीय रजेवर गेल्यामुळे आणि त्यांना अतिदक्षता विभागात दाखल केल्यामुळे सदरचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे पुन्हा माहितीसह प्राप्त झाला नाही म्हणून अपीलार्थीस माहिती देण्यास विलंब झाला तथापी त्यानंतर श्रीमती राठोड ह्या कामावर रुजु झाल्यानंतर ती माहिती तयार करण्यात आली. अपीलार्थीने मागितलेली माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी विलंब झाल्यामुळे विनामुल्य आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीने आयोगासमोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.९३८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री एकनाथ लक्ष्मण कुकडे<br>रा. बांधोना पोष्ट-गिलगांव<br>ता. चामोर्शी जि. गडचिरोली. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी (राजस्व विभाग)<br>कुनघाडा<br>ता. चामोर्शी जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा तलाठी<br>नवेगांव सा. जा. क्र.१,<br>ता. चामोर्शी जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २८/०९/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.१३/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून २६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०८/०४/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी नवेगाव साजा क्र.१ ता. चामोर्शी जि. गडचिरोली यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन मौजा बांधोना येथील बंदोबस्त वेळेतील खसरा न.१२ या भुखंडाच्या जमीनीच्या काबीलकास्त जमीन म्हणून सन १९७५-७६ मध्ये ज्या २५-३० लोकांना शेती व्यवसायाकरिता जमीनी वाटप झाल्या त्या

जमीनीचा खसरा नंबरसह सन १९७५-१९७६ च्या नकाशाची प्रत त्यांनी मागितली होती. त्यांना तलाठी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र सन १९७५-१९७६ च्या नकाशाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मंडळ अधिकारी कुनघाडा यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना सन १९७५-१९७६ च्या नकाशाची प्रत त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.    आज  आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा तलाठी नवेगाव श्री एच.एस.राऊत हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी कुनघाडा श्री मेश्राम हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी तथा तलाठी श्री राऊत यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या दि.०८/०४/२०११ च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलार्थीस दि.२९/०४/२०११ च्या पत्रान्वये सन १९२१-२२ च्या बंदोबस्त नकाशाची प्रत उपलब्ध करुन दिली. तसेच बंदोबस्त वेळेतील सर्व्हे नंबर ८ व १२ मधील वाटप झालेल्या पट्टेधारकांची यादी उपलब्ध करुन दिली. आणि पट्टेधारकांना मिळालेल्या जमीनीचा नकाशा उपलब्ध करुन दिला. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र सन १९७५-७६ च्या नकाशाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा तलाठी आणि मंडळ अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलार्थीस बांधोना यादीतील सन १९२१-२२ च्या बंदोबस्त नकाशातील सर्वे नं.१२ च्या नकाशाची सत्यप्रत उपलब्ध करुन दिलेली आहे मात्र १९७५-७६ च्या बंदोबस्त नकाशाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नाही. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नकाशाच्या प्रती त्यांनी आयोगासमोर दाखविल्या सदरच्या नकाशाच्या प्रती अपीलार्थीने देखील आयोगासमोर पाहिल्या त्यावेळी असे दिसून आले की, सन १९७५-७६ च्या बंदोबस्त नकाशाची प्रत उपलब्ध नाही आणि त्या बाबत अपीलार्थीची खात्री झाली तथापी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२९/०४/२०११ च्या पत्रान्वये आणि दि.३१/०५/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९३७/नाग/२०११</u>**

१. श्री गंगाधर दुलीचंद सोनवाने - **अपीलकर्ता**
रा. तिडका
ता. सडक /अर्जुनी जि. गोंदिया

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी - **उत्तरवादी**
पंचायत समिती सडक/अर्जुनी
ता. सडक /अर्जुनी जि. गोंदिया.

३. जामाहिती अधिकारी तथा सचिव - **उत्तरवादी**
ग्राम पंचायत तिडका
ता. सडक /अर्जुनी जि. गोंदिया.

## (आदेश पारित दिनांक २८/०९/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.१०/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून २६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०७/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत तिडका ता. सडक/अर्जुनी जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्राम पंचायत तिडका येथील झालेल्या कामाबाबत सन २००७ ते २०१० या कालावधीची १ ते ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू त्यांना ३० दिवसात जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील खंडविकास अधिकारी पंचायत समिती सडक/अर्जुनी

यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत तिडका श्री ए. एम. उईके हे हजर होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती सडक अर्जुनी डॉ. बी. आर. कांबळे हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी श्री ए. एम. उईके यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०७/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. मात्र त्यांची प्रकृती बरोबर नसल्यामुळे ३० दिवसांचे मुदतीत अपीलार्थीस ते कोणतीही माहिती देऊ शकले असे त्यांचे म्हणणे आहे. त्यानंतर अपीलार्थीने संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला आणि त्यामध्ये मुद्या क्र.५ व ८ ची माहिती पंचायत समितीमध्ये उपलब्ध असल्यामुळे अपीलार्थीस देण्यात आली आणि मुद्या क्र.१ ते ४ आणि मुद्या क्र.६ ते ७ ची माहिती सचिव ग्राम पंचायत तिडका यांना त्वरीत देण्याचे आदेश प्रथम अपीलात देण्यात आल्याचे डॉ. कांबळे यांनी सांगितले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील अदयापर्यंत जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून माहिती देण्यास विलंब झालेला दिसून येतो. या विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी तथा सचिव श्री उईके यांना खुलासा विचारला असता त्यांनी त्यांचे प्रकृती बरोबर नसल्यामुळे अदयाप पर्यंत माहिती दता आली नाही असे सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही. म्हणून विलंबाबद्यल ते जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून सात दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलार्थीस त्यांच्या दि.०७/१२/२०१० च्या माहिती अर्जातील मुद्या क्र. १ ते ४ आणि मुद्या क्र. ६, ७ ची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच मुद्या क्र. ५ व ८ ची माहिती संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती

सडक/अर्जुनी यांचेकडून उपलब्ध झाली नसल्याचे अपीलकर्त्याने सांगितले त्यामुळे त्यांना संवर्ग विकास अधिकारी यांनी त्वरीत ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत तिडका श्री उईके यांनी अपीलार्थीच्या दि.०७/१२/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला दिसून येतो. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत तिडका यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु.१०,०००/- (रुपये दहा हजार) शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती सडक/ अर्जुनी यांनी जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांच्या दरमहाचे वेतनातून कपात करुन लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करावी. आणि शास्तीची संपूर्ण रक्कम वसूल झाल्यानंतर संवर्ग विकास अधिकारी यांनी चालानसह वसुलीचा अहवाल आयोगाकडे सादर करावा.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९३६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मुनिश्वर गोमाजी बोरकर<br>रामनगर वार्ड क्र.२०, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जामाहिती अधिकारी तथा सचिव<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २८/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.०८/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून २६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०९/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती गडचिरोली यांनी त्यांचेकडील दि.०२/०२/२०११ च्या पत्रानुसार सदरची चौकशी वरिष्ठ तांत्रीक अधिकारी यांचेकडे सोपविण्यात यावी असे पत्र दिले होते. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती.

३. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे दि.०३/०१/२०११ रोजी चौकशी करण्याबाबत पत्र पाठविले होते. तसेच पुन्हा दि.०३/०१/२०११ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे देखील प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याबाबत कळविले आहे. या दोनही पत्राच्या प्रती प्रकल्प अधिकारी यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्या आहेत. सदरच्या प्रती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र त्यांना चौकशी अहवालाची प्रत मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर प्रकल्प अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, प्रस्तुत प्रकरणात चौकशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कार्यकारी अभियंता यांना वर नमुद केल्याप्रमाणे कळविण्याची कार्यवाही केलेली आहे व त्या पत्राच्या प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. म्हणून प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध झालेली असून त्याबाबत अपीलकर्त्याने समाधान व्यक्त केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९३५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मुनिश्वर गोमाजी बोरकर<br>रामनगर वार्ड क्र.२०, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>बांधकाम विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता<br>बांधकाम विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २८/०९/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.०८/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून २६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१४/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या निर्णयानुसार दि.३०/०८/२०१० अन्वये अपील क्र.१००१/२०१० नुसार त्यांनी संबंधित शाखा अभियंता, अरविंद चव्हाण, पंचायत समिती गडचिरोली यांचेवर मुख्य कार्यकारी अधिकारी गडचिरोली यांनी शिस्तभंगाची कार्यवाही करावी असे आदेश दिले होते. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती.

३.  आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद गडचिरोली श्री बी. एन. हिरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री किर्ती हे हजर होते.

जनमाहिती अधिकारी श्री बी. एन. हिरे यांनी आयोगापुढे सांगितले की, मा. राज्य माहिती आयोगाकडील अपील क्र. १००१/२०१० मधील निर्णय दि.१०/०८/२०१० नुसार प्रस्तुत प्रकरणात जे अधिकारी किंवा कर्मचारी जबाबदार असतील त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत असून सदर शिस्तभंगाची कार्यवाही हे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली यांनी करावयाची आहे म्हणून त्याबाबतची माहिती पंचायत समिती गडचिरोली यांचेकडून मागविली आहे. सदरचा अहवाल अप्राप्त आहे. अशी अपीलकर्त्यास माहिती दिली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरच्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.११/०४/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असून याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती गडचिरोली यांचेकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती देखील अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेल्या असल्याने अपीलार्थीस आवश्यक ती माहिती मिळालेली आहे म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.  अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.७८७/नाग/२०११</u>**

१. श्री मनोहर शामराव मंथनवार - **अपीलकर्ता**
तर्फे श्री. गोपाल सोनवाने, हनुमान मंदिर जवळ,
राजगोपालचारी वार्ड, भंडारा.
ता. जि. भंडारा.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता - **उत्तरवादी**
लघु पाटबंधारे (स्था.स्तर) येरवडा, पुणे
बंगला नं. १२, जेलरोड, येरवडा, पुणे-६.

३. जामाहिती अधिकारी तथा सहाय्यक मुख्य अभियंता - **उत्तरवादी**
लघु पाटबंधारे (स्था.स्तर) येरवडा, पुणे
बंगला नं. १२, जेलरोड, येरवडा, पुणे-६.

**(आदेश पारित दिनांक २८/०९/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.१०/०५/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून ०८/०८/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०८/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू यादिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून सदरच्या अपीलाची सुनावणी आज दि.२८/०९/२०११ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.३०/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक मुख्य अभियंता, लघु व पाटबंधारे (स्था.स्तर) येरवडा, पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन अपीलकर्त्याच्या प्रतिकुल शेऱ्या विरुध्द सादर केलेल्या अभिवेदनावर

झालेल्या कार्यवाहीच्या संदर्भात १ ते ३ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.३०/११/२०१० च्या पत्रान्वये माहिती प्राप्त झाली मात्र त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्री वि. र. लोंढे पूणे हे हजर होते. तसेच सदर प्रकरणी माहितीच्या अर्जातील मुद्या क्र.२ व ३ ची माहिती अधिक्षक अभियंता, लघु व पाटबंधारे विभाग नाशीक यांचेशी संबंधित असल्याने अधिक्षक अभियंता व्ही. एम. निकंबे हे उपस्थित होते.

जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक मुख्य अभियंता, पूणे श्री वि. र. लोंढे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.३०/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०९/११/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात मुद्या क्र.१ ची माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे त्या संदर्भात अपीलार्थीस दि.३०/११/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, आपल्या आगाऊ पत्रानुसार प्राप्त अभिवेदना संदर्भात या कार्यालयाने दि.१५/१०/१९९६ आणि दि.१६/०३/१९९९ च्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, लघु व पाटबंधारे (स्थानिक स्तर मंडळ) नाशिक या कार्यालयाचा सविस्तर अभिप्राय मागविलेला आहे. आणि त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे श्री लोंढे यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच श्री लोंढे यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, अपीलकर्ता यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्र.२ आणि ३ ची माहिती अधिक्षक अभियंता, लघु व पाटबंधारे मंडळ नाशीक यांचेशी संबंधित असल्याने त्यांच्या कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२९/११/२०१० च्या पत्रान्वये मुद्या क्र.२ व ३ च्या संदर्भात सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिल्याचे अधिक्षक अभियंता श्री निकंबे यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांच्या प्रतिकुल शेऱ्याच्या संदर्भात त्यांनी दिलेल्या अभिवेदनावर त्यांना अपेक्षित अशी कार्यवाही झालेली नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. तथापी माहितीच्या अधिकारात फक्त माहिती उपलब्ध होत असते म्हणून अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दि.३०/११/२०१० आणि २९/११/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यस पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.९४७/नाग/२०११</u>**

| | | |
|---|---|---|
| १. श्री सूरज सज्जन कुकुडकर<br>मु. पोस्ट. आष्टी, रेस्ट हाऊस रोड,<br>ता. चामोर्शी जि. गडचिरोली -४४२ ७०७. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | |
|---|---|---|
| २. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता<br>शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर<br>मेडीकल चौक, नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक<br>शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर<br>मेडीकल चौक, नागपूर. | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २९/०९/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०६/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२६/०८/२०११ रोजी नोटीस काढून दि.२९/०९/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. आज आयोगापुढे सुनावणीकरीता अपीलकर्ता यांचे वतीने श्री लिमेशकुमार जंगम यांनी बाजू मांडली श्री जंगम यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २८/०३/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन रुग्णालय प्रशासनाच्या संदर्भात अपघात विभागाची कार्य प्रणाली, सेवा योजना, आदेश, नियमावली परिपत्रक याबाबत १ ते ३६ मुद्यांवर प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली

होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदर माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी अधिष्ठाता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकयी अधिक्षक डॉ साळवे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता डॉ. आर. पी. सिंग हे आज सुनावणीकरीता आयोगापुढे उपस्थित होते.

जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकयी अधिक्षक डॉ साळवे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२८/०३/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.३१/०३/२०११ रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने १ ते ३६ मुद्यांची प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली होती. त्यानुसार ज्या मुद्यांची माहिती उपलब्ध होती ती अपीलार्थीस दि.०८/०४/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र त्यांच्या माहिती अर्जातील प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. अपीलकर्त्याच्या दि.२८/०३/२०११ च्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्त्याने रुग्णालय प्रशासनाचे संदर्भात अपघात प्रणाली कार्यसेवा योजना इ. ३६ मुद्यांवर प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितलेली दिसून येते. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी दि.०८/०४/२०११ च्या पत्रान्वये ज्या मुद्यांची माहिती किंवा पत्रकाची प्रत कागदपत्रांचे स्वरुपात त्यांच्याकडे उपलब्ध होती. ती माहिती अपीलार्थीस दि.०८/०४/२०११ च्या पत्रान्वये दिलेली दिसून येते. तसेच अपीलकर्त्याने सदरच्या माहिती अर्जात निर्मला सज्जन कुक्कुडकर यांचेवर करण्यात आलेल्या उपचारा संदर्भात मेडीकल ट्रिटमेंट बुक मध्ये ज्या नोंदी केल्या आहेत. त्याची छायांकित प्रत अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. त्यावरुन अपीलार्थीस मेडिकल ट्रिटमेंट च्या संदर्भात कागदपत्रांच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध होती ती माहिती देखील जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे आणि बाकी मुद्यांची माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे प्रश्नार्थक स्वरुपातील माहिती माहितीच्या अधिकाराखाली उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. तथापी अपीलार्थीस वर नमुद केल्याप्रमाणे कागदपत्रांचे स्वरुपात माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**